
# सर्वसहमतीची निर्णय-प्रक्रिया



: संपादक :

मोहन हिराबाई हिरालाल

# सर्वसहमतीची निर्णय-प्रक्रिया


: संपादक :

मोहन हिराबाई हिरालाल



वृक्षमित्र

चंद्रपूर/गडचिरोली

❖ प्रकाशक :
मोहन हिराबाई हिरालाल
संयोजक, 'वृक्षमित्र'
चिद्दरवार हॉस्पिटलजवळ
शेंडे प्लॉट, रामनगर,
चंद्रपूर - ४४२४०१

दूरध्वनी : ०७१७२-२५८१३४
मोबाईल : ९४२२८३५२३४
वेबसाईट : www.vrikshamitra.org
ई-मेल : vriksha_cha@sancharnet.in

❖ सहयोग राशी : १० रु.

❖ मुखपृष्ठ : प्रवीण बिसने

❖ मुद्रक :
रणजित देसाई
परंधाम मुद्रणालय
पवनार - ४४२ १११
(जि. वर्धा)

निर्णय-प्रक्रिया पाच प्रकारच्या असू शकतात –

- एका व्यक्तीने सर्वांसाठी निर्णय घेणे.
- मूठभर व्यक्तींनी सर्वांसाठी निर्णय घेणे.
- काही थोड्या, निवडून देण्यात आलेल्या व्यक्तींनी सर्वांसाठी निर्णय घेणे.
- बहुसंख्यांनी सर्वांसाठी निर्णय घेणे.
- सर्वांनी मिळून सर्वांसाठी निर्णय घेणे.

पहिल्या चार पद्धती अजमावल्या गेल्या आहेत; आजही सर्वत्र अजमावल्या जात आहेत.

मात्र त्यांतून लोकांचे प्रश्न सुटत आहेत असे दिसत नाही. तणाव आणि संघर्ष समाप्त होत आहेत असे दिसत नाही. उलट संघर्ष अधिक तीव्र होताना दिसतात. लोकांच्या स्वातंत्र्याचा अधिकाधिक संकोच होत आहे, शोषण आणि दमन तीव्र होत आहेत, असे दृश्य दिसत आहे.

सर्वांनी मिळून सर्वांसाठी सर्वसहमतीने निर्णय घेणे स्वप्नाळू मानले जाते. ते अद्याप पुरेसे अजमावले जावयाचेच आहे.

मात्र, हा गैरसमज आहे. सर्वसहमतीने निर्णय घेतले जाऊ शकतात; आणि तसेच ते घेतले गेले पाहिजेत. तरच स्वातंत्र्य आणि समता यांचा अरुणोदय होऊ शकेल.

सर्वसहमतीने निर्णय कां घेतले जावेत आणि कसे घेतले जाऊ शकतात?

या पुस्तिकेत याच प्रश्नाचे उत्तर देण्याचा प्रयत्न आहे.

# अनुक्रमणिका

* भूमिका ---------------------------------------- ५

१. सर्वसहमती आणि मेंढा (लेखा)
*मोहन हिराबाई हिरालाल* ---------------------------------७

२. विनोबांच्या भाषणांतून संकलित उतारे -------------- १३

३. 'ॲक्ट अप – सिव्हिल डिसओबिडिअन्स
मॅन्युअल' मधील उतारे ---------------------------- १५

४. सी.टी. लॉरेन्स बटलर आणि ॲमी रॉथस्टीन
यांच्या 'ऑन कन्‌फ्लिक्ट ॲंड कन्सेन्सस :
ए हॅंडबुक ऑन फॉर्मल कन्सेन्सस डिसीजन-मेकिंग'
या पुस्तकातील उतारे ----------------------------- १९

* परिशिष्ट :

महात्मा गांधींच्या 'हिंद-स्वराज्य'
मधील निवडक भाग ------------------------------ ३७

# भूमिका

सहभागी लोकशाही, नागरी समाजाची पुष्टी, स्वयंसेवी गैरसरकारी संस्थांची वाढती कार्यव्याप्ती – आजच्या राजकीय विचार-विमर्शात या गोष्टींना स्थान मिळालेले आहे. लोकशाही वास्तविक व्हायची असेल तर लोकांचा तिच्यातील सहभाग वाढला पाहिजे याचे भान आले आहे. निवडून आलेल्या प्रतिनिधींवर लोकांचा अंकुश कसा राहू शकेल, याची चर्चाही होत आहे. मात्र, सर्वांनी मिळून सर्वांचा कारभार पाहणे, सर्वसहमतीने निर्णय घेणे आणि सर्वांनी मिळून त्यांची अंमलबजावणी करणे, हाच खऱ्या लोकशाहीचा आशय असू शकतो; अशी व्यवस्थाच 'लोकशाही' म्हटली जाण्यास पात्र आहे, आणि या दिशेने पावले पडण्यातच श्रेय आहे, याची जाणीव अद्याप म्हणावी तशी आलेली नाही. आणि म्हणूनच राजकारणाच्या चरकात 'लोक' भरडले जात आहेत आणि त्यांच्या नावाने प्रतिनिधिशाही, नोकरशाही आणि बाजारशाही यांचा अंमल जारी आहे. विनोबांनी १९४१ मध्येच 'स्वराज्यशास्त्र' मध्ये लिहिले होते –

*''लोकशाही नाव धारण करणारी आणि 'मी सर्वायतन (सर्वांनी मिळून समान जबाबदारीने करून घेतलेली आपली व्यवस्था) आहे' असे भासविणारी एक राज्यपद्धती आहे, जिचे युरोप व अमेरिका या दोन खंडांत नाटक चालू आहे. पण हिंसेवर उभारलेली कोणतीही पद्धती, जरी ती डोक्यागणिक मत मोजण्याचे सोंग करीत असली, तरी सर्वायतन नव्हे.''*

सर्वांनी मिळून समान जबाबदारीने आपली व्यवस्था करून घेणे, हाच ध्रुवतारा असायला हवा. या दिशेने कसे जायचे – निर्णय-प्रक्रियेत आणि निर्णयांच्या अंमलबजावणीत सर्वांचा सहभाग कसा सुनिश्चित होऊ शकेल – याचा विचार करायला हवा.

सर्वसहमतीची निर्णय-प्रक्रिया विकसित करण्याचे या दृष्टीने महत्त्व आहे. दुसऱ्या कोणत्याही प्रकारची निर्णय-प्रक्रिया हिंसक असणे अपरिहार्य आहे. जेव्हा निर्णय-प्रक्रियेत सर्वांचा सहभाग असेल, सर्वांचे मत ऐकले जाईल व त्याची बूज राखली जाईल, तेव्हाच निर्णय लोकांना 'आपले' वाटतील, आणि ते त्यांच्या अंमलबजावणीत सहभागी होऊ शकतील. अशा निर्णय-प्रक्रियेतच सर्वांच्या स्वातंत्र्याची हमी आहे.

म्हणून, सर्वसहमतीच्या निर्णय-प्रक्रियेवर ती स्वप्नाळू – युटोपियन – आहे असा शिक्का मारणे सोपे असले तरी उपयोगाचे नाही. ही निर्णय-प्रक्रिया श्रेयस्कर असेल, तर ती विकसित करण्यासाठी सर्जनशील प्रयोग करणे आवश्यक आहे.

ग्रामदान आंदोलनाच्या काळात विनोबा यासाठी वारंवार आवाहन करीत; कारण या निर्णय-प्रक्रियेतच गावांच्या स्वशासनाची – ग्रामस्वराज्याची – किल्ली आहे, याची त्यांना जाणीव होती. हजारो गावांनी ग्रामदानाचा संकल्प केला. म्हणजे ग्रामस्वराज्य साकार करण्याचा संकल्प केला. म्हणजेच सर्वसहमतीने निर्णय घेण्याचा संकल्प केला. पण दुर्दैवाने त्या संकल्पाच्या सिद्धीच्या दिशेने जोमाने पावले पडू शकली नाहीत. थोडेफार प्रयत्न झाले अवश्य, पण ते फार काळ टिकाव धरू शकले नाहीत. सर्वसहमतीची निर्णय-प्रक्रिया विकसित करण्याचे प्रयत्न पुढे जाऊ शकले नाहीत.

पश्चिमेत क्वेकर पंथाचे लोक सर्वसहमतीने निर्णय घेत आले आहेत. आदर्शवादी समुदायांमध्येही असे प्रयत्न होत आले आहेत. ग्रामसमुदायांमध्ये सर्वसहमती कशी प्रत्यक्षात आणता येईल, याचे शास्त्र आणि कला यांचा विकास मात्र व्हावयाचा आहे. पश्चिमेतील अद्यतन चिंतन या दृष्टीने उपयोगी ठरू शकते. या पुस्तिकेत त्याची थोडी झलक मिळेल.

जागतिकीकरणाच्या लाटेत पाय रोवून तिचा प्रतिकार करण्याचे आव्हान आज उपस्थित आहे. सर्वसहमतीच्या निर्णय-प्रक्रियेचा शोध या पार्श्वभूमीवर अधिकच निकडीचा झाला आहे. तथाकथित 'लोकशाही'चे पितळ उघडे पडले आहे. लोकांच्या प्रतिनिधित्वाचा दावा करणारी 'लोकशाही' सरकारे बाजाराच्या अमंगळ शक्तींशी हातमिळवणी करीत आहेत. आता लोकांनीच या अभद्र युतीविरुद्ध सज्ज झाले पाहिजे. अन्यथा मानवी मूल्यांचे, आणि मानवाचेच, अस्तित्व धोक्यात आहे. आणि सर्वसहमतीची निर्णय-प्रक्रियाच लोकांच्या विविध भावना, मते आणि त्यांच्या हितांचा समन्वय साधून लोकांना एकत्र ठेवू शकते.

ही पुस्तिका म्हणूनच महत्त्वपूर्ण आहे. 'वृक्षमित्र' व त्याचे संयोजक मोहन हिराबाई हिरालाल यांना या कालोचित प्रकाशनासाठी धन्यवाद द्यायला हवेत. या पुस्तिकेमुळे या विषयावरील चर्चेला गती मिळेल आणि प्रयोगांना प्रेरणा मिळेल, अशी आशा करू या.

**– पराग चोळकर**

– १ –

# सर्वसहमती आणि मेंढा (लेखा)

## मोहन हिराबाई हिरालाल

जेव्हा केव्हा बहुमताने निर्णय घेतला जातो तेव्हा दुफळीला सुरुवात होते. निर्णयाला लेबल लागते; निर्णयाच्या बाजूचे व विरुद्ध असे दोन गट पडतात. तेथूनच 'विभागून राज्य करण्याच्या' तत्त्वाला (डिव्हाईड ॲण्ड रूल) सुरुवात होते. निर्णय चुकीचा आहे हे सिद्ध करण्याच्या प्रयत्नाला, निर्णयाच्या विरुद्ध असलेला गट सज्ज होतो आणि निर्णयाच्या अंमलबजावणीत आडकाठ्या येतात, आणल्या जातात.

सर्वसहमती साधणे कठीण आहे, हे मान्य. पण हेही निश्चित, की ते अशक्य नाही. एकदा का सर्वांनी 'सर्वसहमतीने पुढे जायचे' हे निश्चित केले की सर्वसहमतीसाठी जरूर ती मानसिकता तयार होते. दुसरे असे की विरोधातील एखाद्या व्यक्तीचेही मत बरोबर आणि योग्य असू शकते. प्रत्येक पर्यायात काही चांगले, काही वाईट असते, असू शकते. बहुमत पूर्णत: दोषरहित असते असा अट्टाहास चुकीचाच. चर्चेतून, अभ्यासातून, विचारांतून ऊहापोह साधला जातो; इतर दृष्टिकोन समजतात आणि त्यामागची भूमिकाही विशद होते. निर्णयप्रक्रियेतील हाच तर सर्वांत महत्त्वाचा भाग. अनेकदा सखोल विचार न होता, वेळेची सबब पुढे करून, बहुमताचा रेटा राजकारणात, समाजात वापरला जाऊ शकतो.

काही जण विरोध करताहेत ते कां हे समजून घेणे आवश्यक असते. विषयावरील सर्व चर्चा ही प्रश्न सोडवण्यासाठी व सर्वांच्या भल्यासाठी, पर्याय शोधण्यासाठी असते ही भावना असल्यावर विरोधासाठीचा विरोध गळून पडतो, विरोधाच्या कारणमीमांसेवर चर्चा होते, त्यावर मात करण्यासाठी पर्याय पुढे येतात. विचारांची सकारात्मक देवाणघेवाण होऊन संघभावना वाढीस लागते, पर्याय तावून-सुलाखून निघतात. कधी कधी तडजोड होते, 'आज तुमच्यासाठी आम्ही एक पाऊल मागे घेतो, उद्या आमच्यासाठी तुम्हीही अशी वृत्ती ठेवालच' ही आशा व्यक्त केली जाते, समाजातील ऋणानुबंध दृढ होतात आणि एकी बळावते;

कार्याला दिशा मिळून, संघभावनेने कार्य तडीस नेण्यात मग आडकाठ्या येत नाहीत. 'देरसे आये मगर दुरुस्त आये' हाच अनुभव आजवर या पद्धतीत आम्हाला जाणवला. निर्णय काही एकदाच घ्यायचे नसतात. परिस्थितीसुद्धा बदलत असते. आजच्या बहुमतातील घटक उद्या बहुमतात असतीलच याचा काय भरवसा ? त्यामुळे सर्वांना सामावून घेण्याची, कायम स्वरूपाची शक्यता सर्वसहमतीच्या पद्धतीनेच साधता येऊ शकते. त्या पद्धतीतच प्रत्येकाच्या स्वार्थाचे रक्षण करण्याची सोय आहे हे लक्षात आल्यावर ही पद्धत राबवणे वाटते तेवढे कठीण जाणार नाही.

दुर्दैवाने सर्वसहमतीची निर्णय-प्रक्रिया गावसमाजात यशस्वी होणे अशक्य मानले जाते.

मात्र मेंढा (लेखा) गावाने सिद्ध करून दाखवले आहे की हे शक्य आहे.

आणि एका गावात जर हे शक्य आहे, तर कोणत्याही गावात – किंवा लहान नागरी समुदायात देखील – हे निश्चितच शक्य आहे.

मेंढा (लेखा) हे गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तहसिलीतील एक लहान गाव. या गावाने घोषणा दिली आहे, 'दिल्ली-मुंबईत आमचे सरकार, पण आमच्या गावात आम्हीच सरकार !' आणि या घोषणेची अंमलबजावणीही त्याने सुरू केली आहे. गावातील सर्व प्रौढ स्त्री-पुरुषांची मिळून बनलेली गावसमाज-सभा गावाचा कारभार पाहते. तिने आपले नियम, कायदे बनवले आहेत. गावाच्या संबंधातील सर्व निर्णय गावसमाज-सभेत सर्वसहमतीने घेतले जातात. किंबहुना, गावसमाज-सभेने सर्वसहमतीने निर्णय घेतला आहे की सर्व निर्णय सर्वसहमतीनेच घ्यायचे.

मेंढाच्या गावकऱ्यांना लॉरेन्स बटलर काय, गांधीजींचे नाव सुद्धा ठाऊक नव्हते, जेव्हा त्यांनी आपल्या आंतरिक सुजाणपणातून, शहाणपणातून असा निर्णय घेतला. आणि या निर्णयावर ते गेली अनेक वर्षे कायम आहेत.

कदाचित, मेंढा हे गाव पूर्णपणे गोंड आदिवासींचे एकजिनसी गाव आहे म्हणून सर्वसहमतीची पद्धत तेथे चालू शकते, असे वाटू शकते. समाजाचा एकजिनसीपणा ही निश्चितच एक पोषक बाब आहे. राजस्थानमध्ये उदयपूरपासून नव्वद किलोमीटर अंतरावरील सीड या गावातही असाच समूहजीवनाचा प्रयोग श्री. रामेश्वरप्रसाद यांच्या मदतीने यशस्वी झाला. तेथेही

बहुतेक वस्ती एकाच जातीची, रावत समाजाची आहे. समान धारणा, मूल्ये, रीतिरिवाज ही बाब या पद्धतीला अनुकूल आहे. जरूरीची गोष्ट म्हणजे गावाचे आकारमान, साधारण हाकेच्या अंतरावरील वस्ती, हे प्रमाण या प्रयोगास योग्य आहे. असे प्रयोग एकापेक्षा जास्त जातींचे लोक असलेल्या गावांतही झाले आहेत. आणि, एकाच जाती-जमातीचा एकजिनसी समाज असलेली अनेक गावे देशात आहेत, मग तेथेही सर्वसहमतीचा प्रयोग आपोआप कां होत नाही ? म्हणजेच, एकाच जातीचे लोक असणे पुरेसे नसते. असा प्रयोग करण्याची क्षमता सर्वांमध्येच आहे. ती आज सुप्त अवस्थेत बीजरूपाने आहे, परंतु योग्य वातावरण लाभले तर तिला अंकुर फुटू शकतात.

मेंढ्यातील रचना आणि कार्यपद्धती यांवरून या संदर्भात बरेच शिकता येण्यासारखे आहे.

जर समान लक्ष्य असेल तर सर्वसहमती सुलभ जाऊ शकते. गावात असे अनेक प्रश्न असतात, जे गावातील सर्वांचे असतात. किंबहुना, जे प्रश्न समान हिताचे नसतात ते बहुधा अत्यंत गौण असतात; ते एक तर दुहीच्या राजकारणाकरता उपस्थित केले जातात वा मुद्दाम, गाजावाजा करून, त्यांना वाजवीपेक्षा जास्त महत्त्व दिले जाते. परस्पर-विरोधी, पण एखाद्या गटाला महत्त्वाचे वाटणारे जे प्रश्न असतात ते देवाण-घेवाणीच्या पद्धतीने, सामोपचाराने सोडवता येतात.

सर्वसहमतीच्या पद्धतीमुळे निर्णयप्रक्रियेत दिरंगाई होऊ शकते, छोटा घटकही समाजाच्या भल्याच्या एखाद्या निर्णयाला रोखून धरू शकतो, असा एक आक्षेप घेतला जातो. मेंढ्यातील अनुभवावरून असे दिसते की कुणी असा प्रयत्न केलाच तर त्यावर अधिक चर्चा होते व निर्णय खरोखरच समाजाच्या भल्याचा असल्यास त्या छोट्या घटकाला तो जास्त वेळ रोखून धरता येत नाही. जेथे सर्वसहमती होत नाही, अशा निर्णयांबाबत म्हणता येईल की लागणारा वेळ ही दिरंगाई नसून पुढील अंमलबजावणीच्या टप्प्यातील अडथळा दूर करण्याची किफायतशीर व्यवस्था आहे. दुसरी, आणि कदाचित जास्त महत्त्वाची बाब म्हणजे या सर्वसहमतीच्या प्रक्रियेला केव्हा केव्हा, अभ्यास व प्रदीर्घ चर्चेमुळे, जो वेळ लागतो, तो निर्णय घेण्यापूर्वी लागलेला असतो. परंतु अंमलबजावणी-दरम्यानचा

वेळेचा महागडा अपव्यय त्याचमुळे टळतो.


या मुद्द्यावरच्या चर्चेची नोंद करताना व्यवस्थापनशास्त्रातील तज्ज्ञ श्री. सु. गो. तपस्वी यांनी जे लिहिले आहे त्याचा इथे उल्लेख करता येईल. ते लिहितात,

"व्यवस्थापनशास्त्राच्या दृष्टीने विचार करता ही गोष्ट मला फार महत्त्वाची वाटली. कारण, अंमलबजावणीतील दिरंगाई ही निर्णयप्रक्रियेतील दिरंगाईपेक्षा, सर्व दृष्टींनी, फार महाग ठरते; जास्त हानिकारक असते. नर्मदा नदीवरील सरदार सरोवर प्रकल्प हे या स्पष्टीकरणाचे उत्तम उदाहरण आहे. सर्व राज्यांनी सर्व विस्थापितांच्या नेत्यांबरोबर चर्चा करून सर्वसहमतीने या प्रकल्पाची सर्वंकष रूपरेषा जर सुरुवातीला नक्की केली असती तर कदाचित, प्रकल्पाच्या सुरुवातीस निर्णयप्रक्रियेत एक-दोन वर्षांचा विलंब झाला असता, परंतु आज अंमलबजावणीत जागोजागी येणाऱ्या अडथळ्यांना तोंड देता देता दहा वर्षांहून अधिक काळ लोटला तरीही प्रकल्प पूर्ण होऊ शकलेला नाही, ही बाब टाळली गेली असती. अर्धवट कामासाठी झालेल्या गुंतवणुकीवरील फक्त व्याजाचा जरी हिशोब केला तरी जो अतोनात पैसा वाया जात आहे, त्याचा नुसत्या आर्थिक दृष्टिकोनातून जरी विचार केला तरी सर्वसहमतीसाठी वर्ष-दोन वर्षे लागली असती तरीही ती खूप स्वस्ताची ठरली असती."

मेंढ्याच्या बाबतीतील एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांनी सर्वसहमतीने निर्णय घेतला आहे की गावाशी संबंधित सर्व निर्णय सर्वसहमतीनेच घ्यायचे. सर्वसहमतीने निर्णय घ्यायचे, हे पक्के ठरल्यामुळे ती साध्य करण्यासाठी अर्धवट प्रयत्न होत नाहीत; पूर्ण आस्थेने होतात. सर्वांना सहभागाची केवळ संधीच मिळत नाही, तर त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातात. न बोलणाऱ्यांना बोलण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. जास्तीत जास्त सहभाग सुनिश्चित करण्यासाठी मेंढ्याच्या गावसमाज-सभेने ठरावच केला आहे की प्रत्येक कुटुंबातून किमान एक पुरुष व एक स्त्री सदस्याने गावसमाज-सभेच्या बैठकीस उपस्थित झालेच पाहिजे; नाहीतर त्यांना दंड केला जाईल !

गाव-पातळीवरील प्रश्नांचा, मुद्द्यांचा साधकबाधक विचार करण्याची कुवत लोकांच्या ठायी असतेच. याशिवाय, गावसमाज-सभेला निर्णय घेण्यास मदत करण्यासाठी अभ्यास मंडळाची रचना उपयुक्त ठरू शकते. मेंढ्यात असे

अभ्यास मंडळ काम करीत आहे. अभ्यास मंडळात चर्चा-विचारात रस असणाऱ्या गावातील लोकांखेरीज बाहेरचे लोकही सहभागी होऊ शकतात. अभ्यास मंडळ एक प्रकारची अनौपचारिक व सैल रचना आहे. त्याचे नियमित कोणी सदस्य नाहीत, पदाधिकारी नाहीत. त्यातील सहभाग ऐच्छिक आहे, त्याच्या बैठकी किती-केव्हा व्हायच्या हेही काही ठरलेले नाही. गावसमाज-सभेपुढच्या मुद्द्यांचा सखोल विचार या अभ्यास मंडळात होतो. येथे निर्णय घ्यायचा नसतो, फक्त विषयाचे सगळे पदर उलगडून पहायचे असतात. अभ्यास मंडळाची ज्ञान-प्रक्रिया खालीलप्रमाणे दाखवता येईल –




निर्णयासाठी सर्वसहमतीच्या प्रक्रियेचा स्वीकार केला की अंमलबजावणीतही जास्तीत जास्त लोकांचा सहभाग सुनिश्चित करणाऱ्या रचना आवश्यक ठरतात. मेंढ्याने बँक खात्याबद्दल केलेली व्यवस्था या दृष्टीचे एक उदाहरण म्हणून नोंदवता येईल. बँक खात्यातून पैसे काढण्यासाठी गावसमाज-सभेने दोन व्यक्तींना अधिकृत केले आहे, मात्र पासबुक तिसऱ्याजवळ असते, खर्च करणारा चौथा आणि हिशेब पाचवा लिहितो. या सर्वांनी गावसमाज-सभेच्या निर्णयानुसार चालायचे असते. ह्या पाचही व्यक्ती गावसमाज-सभा केव्हाही बदलू शकते. या व्यवस्थेतून पारदर्शकताही साधली जाते व भ्रष्टाचार टळतो.

सर्वसहमती साधण्यासाठी धीर लागतो. दारूपासून मुक्त होण्यासाठी

मेंढ्याला वर्षभर लागले. पण मग ती दारूमुक्ती यशस्वीही झाली आहे, टिकून आहे. गावाचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी व कायद्याने अधिक अधिकार मिळवण्यासाठी ग्रामदान करण्याचा मेंढा विचार करीत आहे. बहुसंख्य लोक यासाठी तयारही आहेत. पण सर्वसहमती अजून झालेली नाही. त्यासाठी प्रयत्न चालू आहेत. निर्णय घ्यायला वेळ लागला तरी सर्वसहमतीमुळे पुढील प्रश्न टळतात, निर्णयांची उत्तम प्रकारे त्वरेने अंमलबजावणी होऊ शकते, याचे मेंढ्याला भान आहे.

सर्वसहमतीच्या संदर्भात जागतिक स्तरावर चाललेल्या चिंतनातून मेंढ्याला खूप शिकण्यासारखे आहे, आणि या चिंतनाला मेंढा आपले वैशिष्ट्यपूर्ण योगदानही करीत आहे.

> बहुसंख्य माणसांनी केलेला कायदा अल्पसंख्यांना बंधनकारक असतो असे मानणे हा नास्तिकपणा आणि अंधश्रद्धा आहे. बहुसंख्यांनी केलेले कायदे चुकीचे आढळून आल्याची आणि अल्पसंख्यांचे मत बरोबर असल्याची उदाहरणे पुष्कळ सापडतील. सगळ्या सुधारणा या अल्पसंख्यांनी बहुसंख्यांच्या विरुद्ध जाऊनच झालेल्या आहेत. ठग लोकांच्या राज्यात ठगविद्येचे ज्ञान जर सक्तीचे मानलेले असले तर काय त्या राज्यातल्या सज्जन माणसाने ती सक्ती मान्य करायची ? केव्हाही नाही. अन्यायी कायद्याला मान दिलाच पाहिजे हा भ्रम जोवर दूर होणार नाही तोवर आपली गुलामी मुळीच जाणार नाही.
>
> – **गांधीजी**

## – २ –

## (विनोबांच्या भाषणांतून संकलित)

मनुष्यातील सत्ता-वासना नष्ट करायची आहे. सत्ता-वासनेला नियंत्रित आणि कुंठित करण्यासाठीच लोकशाहीत प्रत्येकाला मताधिकार देण्यात आला आहे. त्याचा अर्थच हा आहे की सत्ता सर्वांमध्ये वाटली जावी.

प्रत्येकाला मत देण्याचा अधिकार आहे. प्रत्येकाची शरीरशक्ती, बुद्धी वेगळी आहे. प्रत्येकाजवळ वेगवेगळी संपत्ती आहे. तरीही सर्वांना एक मत देण्याचा अधिकार असण्याला आधार काय ? आत्म्याची एकरूपता हाच तो आधार, हे स्पष्ट आहे.

परंतु लोकशाहीच्या या विचारात एक उणीव राहून गेली आहे. प्रत्येकाला मताधिकार दिला खरा; परंतु त्या मतांची मोजणी करून, ४९ जणांच्या मताकडे दुर्लक्ष करून ५१ जणांना राज्यसत्ता सोपवली गेली. मात्र लक्षात घ्यायला पाहिजे की हा गणिताचा विषय नाही, वेदांताचा आहे; येथे संख्येचा प्रश्न गौण आहे.

सर्वोदय म्हणतो, तुमचा विचार पूर्ण करा. सर्वांचा विचार मान्य करून काम करा. पाच जणांमध्ये तिघांचे एक मत आणि दोघांचे दुसरे, असे असेल तर तिघांचा विचार खरा, असे मानणे चुकीचे आहे. पाचही जण एकमताने जो निर्णय देतील तो मान्य करायला हवा. असे न करण्यामुळेच आज जगात बहुमत-अल्पमताची भांडणे सर्वत्र चालली आहेत.

मुंबई-दिल्लीच्या बुद्धीने सगळे काम चालले तर लोकांना त्या कामात कधीच उत्साह वाटणार नाही. म्हणून विकेंद्रित योजना पाहिजे. आणि विकेंद्रित शासन सुद्धा सर्वसंमतीनेच चालले पाहिजे. केवळ काठावर बहुमत असलेल्यांचे शासन नको. अलीकडे ५१ चे शासन ४९ वर चालू असते. अशा शासनाने झगडे, परस्पर-मत्सर, द्वेष वाढतात. सर्वसंमतीने अथवा सर्वानुमतीने कारभार चालला पाहिजे. कुठे थोडा मतभेद झाला व कुणा एकाचे मत विरुद्ध असले तर त्याने आपले मत सांगून टाकून मग इतरांच्या मताला अनुकूल व्हावे. ह्यालाच सर्वानुमती म्हणायचे.

सर्वानुमतीने चालणाऱ्या नीतीलाच लोकनीती म्हणतात. ती कशी आणता येईल याचा विचार करायला हवा. सुरक्षा परिषदेने विशेषाधिकाराच्या रूपात

याचा थोडा आरंभ केला आहे. क्वेकर्सही सर्वानुमतीने निर्णय घेतात. ही लहान उदाहरणे आहेत, परंतु हे लोकनीतीचे प्रयोग आहेत. ते आपण पुढे न्यायला हवेत.

सर्वानुमती व सर्वसंमती यावर एक आक्षेप असा येतो की एखाद्या वेळी एखादाच मनुष्य अडवून धरील तर मग काय करायचे ? त्याच्या विचारात बदल कसा घडवून आणायचा ? जो अडवीत असेल त्याच्या विचारात सत्य तरी असेल किंवा तो त्याचा हट्ट असेल. सत्य असेल तर तो आपला विचार समाजाला समजावून सांगेल. सत्य विचाराचा एक मनुष्य सर्वांना आवरून घेऊ शकतो, आपल्या बाजूने वळवू शकतो, हे सर्वांना चांगले माहीत आहे. त्याच्या बाजूने सत्य जर नसेल तर त्याचा विरोध कसा जिरवावा याचा मार्ग ग्रामसभेने शोधून काढला पाहिजे. आपला मार्ग निखळ कसा करावा याची युक्ती ग्रामसभेला साधली पाहिजे. दंडाच्या आधारावर जे शासन असते त्यात राहून सर्वानुमतीचे आणि सर्वसंमतीचे तत्त्व साधू शकत नाही. शासन प्रेमाच्या आधारावरच असले पाहिजे. ह्यालाच शासनमुक्ती म्हणतात.

एखाद्या ग्रामसभेत सर्वसंमतीने व सर्वानुकूल निर्णय एखाद्या वेळी झाला नाही तरी अन्य गावे पुढे जात आहेत हे पाहून त्यांच्या मनावर परिणाम झाल्यावाचून राहणार नाही. प्रेमाचा आग्रह राखल्यामुळे सावकाश का होईना, पण समाजाची प्रगती होते, असा विश्वास नसेल तर मग भयानेच प्रगती होते असे मानावे लागेल. वास्तविक ती खरी प्रगती नव्हे. कशी का होईना, पण एकदाची लवकर प्रगती होऊ दे, अशी घाई करून, कसे तरी करून राष्ट्रे उन्नती करून घेतात, ती खरी उन्नती नव्हे हे पुढे त्यांच्याच लक्षात आल्यावाचून राहणार नाही. मुलाने गहू पेरला आहे. त्याचे लहान रोपटे उगवले आहे. पण त्याला जर घाई झाली की रोपटे आणखी लवकर वर आले पाहिजे, व त्यासाठी तो ते रोपटे उपटून वर काढेल तर काय ते वाढणार आहे ? प्रजेची शक्ती न वाढविता वरून योजना लादली तर ते गहू उपटण्यासारखेच होईल.

बहुमताच्या सिद्धांतामुळे आपण आपला मूळ स्वभावच सोडत आहोत. सर्वानुमतीने काम करणेच आपल्या मूळ स्वभावात आहे.

गावाची एकता भंगत असेल तर आपला माताग्रह ठेवू नये, एवढे लक्षात आले तर सर्वानुमती साधणे कठीण जाणार नाही.

## – ३ –

## ('ॲक्ट अप : सिव्हिल डिसओबिडिअन्स मॅन्युअल' मधून साभार)

### सर्वसहमती आहे तरी काय ?

सर्वसहमतीची प्रक्रिया ही समूहात निर्णय घेण्याची एक प्रक्रिया आहे. समूहामधील सर्व लोकांचे एखाद्या निर्णयाबद्दल मतैक्य जिच्यामुळे होईल अशी पद्धती आहे. चर्चेत सहभागी होणारे स्वत:चे विचार, कल्पना मांडतात. त्या सर्वांना एकत्रित करून सर्वमान्य निर्णय घेतला जातो. सर्वसहमतीच्या निर्णयाद्वारा समूहासाठी योग्य, चांगला निर्णय घेण्याचा तर प्रयत्न असतोच, पण याबरोबरच या निर्णय-प्रक्रियेद्वारा संबंधित समूहातील लोकांच्या मनातील सामूहिकतेची भावना सुदृढ व्हावी व त्यांचा आपसातील परस्पर-विश्वास वाढावा असाही प्रयत्न असतो.

### सर्वसहमती व मतदान यांमधील फरक

एखाद्या प्रश्नावर जेव्हा मतदान घेतले जाते तेव्हा तो प्रश्न सोडविण्याचे जे अनेक मार्ग उपलब्ध असतात त्यांपैकी एकच मार्ग स्वीकारला जातो. याउलट सर्वसहमतीमध्ये अनेक पर्यायांचा समन्वय व एकत्रीकरण साधले जाते.

मतदानाच्या पद्धतीत एक तर जिंकणे असते किंवा हरणे. म्हणून जिंकण्यासाठी मुद्द्यापेक्षा त्याच्या बाजूने किती संख्या आहे, इकडे जास्त लक्ष दिले जाते. मतदानात व्यक्तींच्या भावना किंवा गरजा लक्षात घेतल्या जात नाहीत. निर्णय घेण्याची ही पद्धती गुणात्मक नसून संख्यात्मक असते.

सर्वसहमतीसाठी मतभेद दूर करत करत सर्वांच्या दृष्टीने समाधानकारक निर्णयाप्रत पोहचावे लागते. एखाद्या व्यक्तीची अंतर्दृष्टी किंवा पक्का विश्वास संपूर्ण गटाच्या निर्णयाची दिशा बदलू शकतात. या पद्धतीत कोणाचाही विचार दुर्लक्षित केला जात नाही; प्रश्न सोडविण्याकरिता प्रत्येकाचे योगदान महत्त्वाचे मानले जाते.

सर्वसहमतीने निर्णय घेण्याशी बांधिलकी असलेले लोक, त्यांना योग्य वाटेल तर, कधी एकाचा निर्णय मान्य करण्याचे किंवा कधी बहुमताने निर्णय घेण्याचे

ठरवू शकतात; परंतु जेव्हा एखाद्या प्रश्नासंबंधी लोकांच्या तीव्र भावना असतील, राजकीय, नैतिक किंवा असाच कोणता महत्त्वाचा प्रश्न निर्माण झाला असेल, तेव्हा ते सर्वसहमतीने निर्णय घेण्याचेच ठरवतील.

## सर्वसहमतीचा अर्थ

सर्वसहमतीचा अर्थ असा नाही की प्रत्येकाला घेतलेला निर्णयच उत्तम वाटतो, किंवा तो निर्णय योग्य प्रकारे काम देईल असे वाटते. तिचा अर्थ हा आहे की प्रत्येकाला असे वाटले पाहिजे की त्यांनी संबंधित प्रश्नाबाबत जी भूमिका घेतली आहे ती निर्णय घेताना सर्वांच्या ध्यानात आली आहे, ती त्यांनी समजून घेतली आहे, आणि त्या भूमिकेबाबत कुठलाही गैरसमज त्यांच्या मनात नाही. मात्र, अशा पद्धतीने घेतलेला निर्णयच सर्वोत्तम असल्याचे प्रत्येकाला वाटण्याची शक्यता जास्त आहे, कारण व्यक्तीपेक्षा सामूहिक बुद्धीतून जास्त चांगले उपाय समोर येतात.

सर्वसहमती साधण्यासाठी खूप वेळ लागतो. सर्वच सभासदांचे कसब पणाला लागते. खूप प्रकारांनी प्रयत्न करावा लागतो. परंतु मग झालेल्या निर्णयाशी सर्वांचीच बांधिलकी निर्माण होते. प्रत्येक निर्णय घेण्याच्या वेळी सभासदांना आपापसात चर्चा करावीच लागते. या चर्चेतून, परस्पर-संवादातून व त्यातून घेतलेल्या निर्णयातून सभासदांना प्रत्येक वेळी नवाच अनुभव येत असतो. याशिवाय सर्वांची मतेही कळतात, व यातून सर्वसहमती साधण्याचे कसब वाढत जाते.

सर्वसहमतीचा सकारात्मक अनुभव यावयाचा असेल तर –

१) सर्वांची समान मूल्यांना मान्यता हवी.

२) समूहातील आदान-प्रदान आणि विवाद-निवारणाकरिता आवश्यक असलेले कौशल्य थोड्याफार प्रमाणात सर्व सदस्यांजवळ असावे, आणि निर्णयाप्रत येता येईल इतकी संधी इतरांना देण्याची तयारी हवी.

३) समूहातील सदस्यांची समूहाशी बांधिलकी व त्याच्याप्रती जबाबदारी असावी.

४) सर्वसहमतीने निर्णय घेण्यासाठी प्रत्येकाला पुरेसा वेळ देण्याची तयारी हवी.

## सर्वसहमतीसाठी प्रस्ताव-मांडणी

चर्चेत प्रथम एक प्रस्ताव मांडला जातो. चर्चेतून त्यात फरक व सुधारणा होत जातात. चर्चेचे दरवाजेच बंद होणार असतील, तर ती सूचना मागे घेतली जाते. चर्चेत मतभेदांची स्पष्ट मांडणी होणे महत्त्वाचे असते. ज्यांना प्रस्ताव मान्य नसेल त्यांच्यावर पर्यायी सूचना सुचविण्याची जबाबदारी असते.

या प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक सदस्याला स्वेच्छेने स्वत:चे मत स्वत:च्या शब्दांत व्यक्त करण्याचा अधिकार असतो. ही प्रक्रिया प्रत्येक सदस्याला बोलण्याची मुभा, व त्याचे बोलणे इतर सभासद ऐकतील याची हमी देत असते. कोणत्याही प्रकारचा दबाव किंवा सौदेबाजी याऐवजी सर्जनशील पर्याय, आणि तडजोडीऐवजी समन्वय यांच्यासाठी प्रयत्न केला जातो.

जेव्हा सभेपुढे मांडलेला प्रस्ताव सर्वांना नीट समजला आहे आणि त्यात कोणीही बदल सुचवत नाही असे दिसते, तव्हा समन्वयक या प्रस्तावाबाबत कोणाच्याही मनात शंका किंवा आक्षेप आहेत का, असे विचारू शकतो. असे विचारले असतानाही कोणी काहीच हरकत घेत नाही असे जेव्हा लक्षात येते तेव्हा क्षणभराच्या मौनानंतर निर्णय प्राप्त होतो. पुन्हा एकदा निर्णय वाचून दाखविला जाणे उपयोगी असते, ज्यामुळे प्रत्येकाच्या मनात निर्णयाबाबत स्पष्टता होऊ शकते.

## सर्वसहमती साधण्यात येणाऱ्या अडचणी

ज्याचे समर्थन करता येणार नाही असा निर्णय घेतला जात असेल, किंवा घेतला गेला असेल, तर आपली मतभिन्नता अनेक प्रकारे नोंदविता येते.

१) *पाठिंबा न देणे :* (“मला या निर्णयाची गरज वाटत नाही; परंतु मी सर्वांबरोबर राहतो, विरोध करीत नाही.”)

२) *हरकत प्रकट करणे :* (“मला वाटते की निर्णय चुकीचा आहे, पण मी त्याची अंमलबजावणी खपवून घेऊ शकतो.”)

३) *वेगळे राहणे :* (“मी निर्णयाला पाठिंबा देऊ शकत नाही, परंतु इतरांना मी अडवणार नाही.”)

४) *अडथळा निर्माण करणे :* (“मी निर्णयाशी सहमत नाही आणि इतरांनाही असला निर्णय घेऊ देणार नाही, कारण हा अनैतिक आहे.” निर्णयामुळे गटातील एखाद्या सदस्याच्या मूलभूत नैतिक मूल्यांवरच आघात होत असेल तर

सहमतीत अडथळा आणणे त्याची जबाबदारीच आहे.)

५) *समूहाचे सदस्यत्व सोडणे.*

नवीन प्रस्तावावर सर्वसहमती होण्यात अडचणी आल्या, तर जुन्याच सर्वसंमत निर्णयावर कायम राहिले जाते.

**सर्वसहमतीच्या प्रक्रियेतील विविध भूमिका**

सर्वसहमतीच्या प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या सदस्यांना काही जबाबदाऱ्या घेणे आवश्यक असते, कारण त्यामुळे ही प्रक्रिया सुलभ होते. जशी समन्वयकाची भूमिका करण्याची जबाबदारी. समन्वयकामुळे सर्वसहमती साधणे सुलभ होते, कारण तो सदस्यांना चर्चेत मदत करतो. तो सदस्यांना बोलते करतो, मुख्य मुद्द्यावर चर्चा केंद्रित ठेवतो, सर्वांचा सहभाग सुनिश्चित करतो, आणि सहमतीला आकार देऊन तिचे परीक्षण करतो. प्रत्येक पायरीवर सदस्यांना आवश्यक ती मदत करतो.

समन्वयक बैठकीतील चर्चेच्या प्रक्रियेला दिशा देतो; आशयाला नव्हे. तो निर्णय करीत नाही; चर्चा कशी व्हावी हे तो ठरवतो. जर समन्वयक समूहात चालू असलेल्या चर्चेत निरपेक्षपणे निरीक्षण करू शकत नसेल, चर्चेला असलेल्या विषयाशी भावनिकदृष्ट्या नको तितका गुंतलेला असेल, तटस्थ राहू शकत नसेल, तर त्याने आपले काम दुसऱ्या व्यक्तीकडे सोपवणे बरे.

वातावरण-निरीक्षकाचीही एक भूमिका असते. तो व्यक्तींच्या व समूहाच्या भावना व त्यांच्या सहभागाची पद्धती यांचे निरीक्षण करून टिप्पणी करतो.

कामाची नोंद ठेवणारा बैठकीतील सभासदांच्या बोलण्याचे टिपण ठेवतो; विशेषतः सर्वसंमत निर्णय व त्यांच्या अंमलबजावणीची पद्धती यांची नोंद करतो.

समय-नोंदणी करणारी व्यक्ती वेळेनुसार सर्व कामकाज चालले आहे की नाही हे बघते.

सभेतील काही सभासद ही वेगवेगळी कामे सांभाळत असले तरी सभेत चाललेल्या चर्चेची सर्वांना जाण असायला हवी. त्या विषयाबद्दल त्यांना आस्था हवी. समूहात चर्चा नीट चालावी व सर्वांनी सर्वसहमत निर्णयापर्यंत पोचावे यासाठी आपले व्यक्तिगत कौशल्य त्यांनी वापरले पाहिजे – विशेषतः जेव्हा बरीच मतभिन्नता दिसते व त्यातून मार्ग काढून सर्वमान्य निर्णयापर्यंत पोचायचे असते.

## - ४ -

## (सी.टी. लॉरेन्स बटलर आणि ॲमी रॉथस्टीन यांच्या 'ऑन कन्फ्लिक्ट अँड कन्सेन्सस : ए हँडबुक ऑन फॉर्मल कन्सेन्सस डिसीजन-मेकिंग' या पुस्तकातून साभार)

**औपचारिक सहमती**

आपण परस्पर-सहकार्याने राहण्यास शिकले पाहिजे, विवादांचे निराकरण अहिंसक पद्धतीने केले पाहिजे, आणि आपले निर्णय सर्वसहमतीने घेतले पाहिजेत. आपण वैविध्याचे महत्त्व लक्षात घेतले पाहिजे आणि जीवनाबद्दल केवळ शारीरिक पातळीवरच नव्हे, तर भावनिक, बौद्धिक आणि आध्यात्मिक पातळ्यांवरही आदर बाळगला पाहिजे. हे आपणा सर्वांनाच करायला हवे.

एखाद्या निर्णयाचा ज्याच्या-ज्याच्यावर परिणाम होत असेल त्याचा-त्याचा निर्णय-प्रक्रियेत सहभाग असला पाहिजे, असा आमचा विश्वास आहे. यामागे अनेक कारणे आहेत. निर्णयात संपूर्ण समूहाची इच्छा प्रकट झाली पाहिजे; केवळ नेतृत्वाची इच्छा नव्हे. योजनांची अंमलबजावणी करणाऱ्यांना मग आपल्या कामात जास्त समाधान वाटेल.

औपचारिक सहमतीला एक निश्चित आकार असतो. त्यासाठी सक्रिय सहकार्य, बोलण्या-ऐकण्यातील शिस्त आणि प्रत्येक सदस्याच्या योगदानाबद्दल आदर, यांच्याशी बांधिलकी असायला हवी. त्याचप्रमाणे, प्रत्येक व्यक्तीवर एक सर्जनशील व्यक्ती म्हणून सक्रियपणे सहभागी होण्याची जबाबदारीही असते.

बैठकीत विवाद व संघर्ष टाळणे, त्यांचे अस्तित्व नाकारणे, त्यांना दडपून टाकणे नित्याचे असते. म्हणून औपचारिक सहमतीची निर्मिती सुरुवातीला कठीण जाऊ शकते. पूर्वी न मिटविले गेलेले विवाद उफाळून येऊ शकतात आणि सहमती-निर्मितीची प्रक्रिया, अशक्य जरी नाही तरी, कठीण अवश्य करू शकतात. परंतु या प्रक्रियेने काम करण्याची सवय व अनुशासन असेल तर ती कठीण राहणार नाही. सर्वांचे म्हणणे ऐकले जावे यासाठी सुरुवातीला झगडावे लागेल, परंतु त्यामुळे सर्वांचा सहभाग व सर्वांचे सहकार्य मिळण्याचा जो लाभ होईल तो मूल्यवान असेल.

## विवाद आणि संघर्ष

निर्णय-प्रक्रियेचा जेवढा सहमतीशी संबंध आहे तेवढाच विवाद व संघर्षांशी आहे. जेव्हा विवादांच्या प्रकटीकरणाला प्रोत्साहन दिले जाते आणि ते सर्जनशीलतेने, अहिंसक पद्धतीने, सर्वांबद्दल आदर बाळगून, परस्पर-सहकार्याने सोडवले जातात, तेव्हा त्या वातावरणात औपचारिक सहमतीची पद्धती उत्तम प्रकारे काम करू शकते. विवादांचे स्वागतच करायला हवे. ते टाळण्याची, त्यांचे अस्तित्व नाकारण्याची गरज नाही.

## बहुमताचे शासन आणि स्पर्धा

सामान्यत: जेव्हा समूहात मतदान घेतले जाते आणि बहुमताचे शासन मान्य करण्यात येते, तेव्हा त्या समूहात स्पर्धेचे गतितत्त्व निर्माण होते, कारण तेव्हा समूहातील व्यक्तींना दोन किंवा त्याहून जास्त पर्यायांपैकी एकाची निवड करायला सांगण्यात येते. मग दुसऱ्याच्या मतावर हल्ला चढवणे तेवढेच समर्थनीय मानले जाते, जेवढे स्वत:च्या मताचे समर्थन करून त्याला पुष्टी देणे. अनेकदा तर परस्परांवर हल्ले चढवण्यातच वेळ जातो, आणि कोणतीही बाजू स्पष्टपणे मांडली जाण्यापूर्वीच मतदानाची वेळ येते. अशा प्रकारच्या वातावरणात स्वत:ची मते आवश्यक तर सुधारण्याऐवजी त्यांच्यावर ठाम राहणे व त्यांचे हिरीरीने समर्थन करणे पत्करले जाते.

## सहमती आणि सहकार्य

याउलट, सहमतीची प्रक्रिया सहकार्याचे गतितत्त्व निर्माण करते. एका वेळी एकाच पर्यायाचा विचार केला जातो. समूहाच्या दृष्टीने सर्वोत्तम निर्णय घेण्यासाठी सर्वजण एकत्र मिळून प्रयत्न करतात. ज्या ज्या शंका मांडल्या जातील त्यांचे निराकरण केले जाते, आणि असे करताना सर्वांचे म्हणणे ऐकले जाते. कोणतीही सूचना ती मांडणाऱ्याची व्यक्तिगत बाब राहत नाही, आणि म्हणून सहकार्यातून सर्वमान्य तोडगा काढल्या जाऊ शकतो.

## प्रस्ताव

जे प्रस्ताव सर्वमान्य उद्देशांच्या पूर्तीसाठी असतात, त्यांचाच सहमतीच्या प्रक्रियेत विचार केला जातो. त्या प्रस्तावांवर विचार करताना प्रत्येकजण त्यात सुधारणा सुचवतो, आणि त्यातून समूहासाठी सर्वोत्तम निर्णयावर येण्याचा प्रयत्न

केला जातो. समूहाच्या हिताच्या विरोधी नसतील अशा सर्वच प्रस्तावांना मान्यता दिली जाते.

## हिंसा किमान असलेली प्रक्रिया

सत्तेचा वापर करून इतरांना दडपणे हिंसक आणि अयोग्य आहे, अशी पारंपरिक अहिंसेच्या सिद्धांताची धारणा आहे. अहिंसेची अपेक्षा असते की लोकांनी सत्तेचा वापर इतरांचे मत वळवण्यासाठी अवश्य करावा, परंतु फसवणूक, दबाव, मत्सर यांना त्यात थारा नको. याउलट, तसे करताना सत्य, सर्जनशीलता, तर्कशुद्धता, व इतरांबद्दल प्रेम आणि आदर असले पाहिजेत. बहुमताची निर्णय-प्रक्रिया व सांसदीय पद्धती, या दोहोंचीही सत्तेचा दुसऱ्याला दडपण्यासाठी वापर करण्यास मान्यता असते; किंबहुना सत्तेचा असा वापर करण्यास त्यांत उत्तेजनच दिले जाते. समूहाच्या दृष्टीने कोणता पर्याय महत्त्वाचा आहे याचा विचार त्यात केला जात नाही, तर आपल्या बाजूने बहुमत कसे वळेल हे पाहिले जाते. अल्पमतात असणाऱ्यांच्या इच्छा, शंका, चिंता यांच्यावर बहुसंख्यांची इच्छा कुरघोडी करते. ही गोष्ट मुळातच हिंसक आहे. सहमतीच्या प्रक्रियेत सर्वांच्या शंका व चिंतांचा विचार केला जातो, आणि निर्णय घेण्यापूर्वी त्यांचे निराकरण केले जाते. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे सहमतीच्या प्रक्रियेमुळे असे वातावरण बनण्यात मदत होते, ज्यात प्रत्येकाचा आदर केला जातो आणि प्रत्येकाच्या योगदानाची बूज राखली जाते.

## लोकतंत्रात्मक स्वरूपाची निर्णय-प्रक्रिया

जेव्हा समूहाला अधिकाधिक लोकांचा सहभाग हवा असतो तेव्हा त्यांना सर्वसमावेशक प्रक्रियेचा स्वीकार करावाच लागतो. हा सहभाग जर व्यापक प्रमाणात हवा असेल तर प्रक्रिया अशी असणे आवश्यक असते, जिच्यात सहभागाला प्रोत्साहन मिळेल, प्रत्येकाला स्वतःच्या सक्षमीकरणाची समान संधी असेल, सहकार्याची वाढ होईल आणि सर्वांची शक्ती वाढेल; शिवाय, समूहाच्या कृतींबद्दल व्यक्तिगत जबाबदारीची जाणीवही ज्यातून निर्माण होईल. या सर्व गोष्टी औपचारिक सहमतीच्या प्रक्रियेच्या आधारशिला आहेत. अनेक उपलब्ध पर्यायांमधून एकाची निवड करणे हा सहमतीच्या प्रक्रियेचा उद्देश नसतो; तर समूहाच्या दृष्टीने सर्वांत योग्य निर्णय विकसित करणे तिला अभिप्रेत असते. स्पर्धा

आणि घर्षण नव्हे, तर समन्वय आणि विकास हे तिचे सूत्र असते.

**अधिकाधिक सहभाग उपयोगी**

सहमती म्हणजे केवळ समूहातील व्यक्तींच्या कल्पनांची बेरीज नव्हे. जेव्हा चर्चा होते तेव्हा नवनव्या कल्पना पुढे येतात आणि शेवटी सर्वोत्तम निर्णयापर्यंत प्रवास होतो. कल्पनांची देवाणघेवाण या प्रक्रियेत होते. समूहासाठी सर्वांत योग्य काय याचा शोध प्रत्येकजण घेतो. सर्जनशीलतेची यात महत्त्वाची भूमिका असते. या प्रक्रियेत जेव्हा जास्त लोक सहभागी होतात तेव्हा कल्पना अधिक जास्त प्रमाणात पुढे येतात, अधिक वेगवेगळे पर्याय समोर येतात. जेव्हा समूहातील प्रत्येकाचा सहभाग असतो तेव्हा सहमतीची प्रक्रिया सर्वांत चांगल्या प्रकारे काम करते.

**सहमती वेळ घेणारी नाही**

निर्णय घेणे, हेच काही साध्य नसते. निर्णय घेण्याची प्रक्रिया एखाद्या कल्पनेपासून सुरू होते आणि निर्णयाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीपर्यंत काम करते. एकाधिकारशाहीत निर्णय त्वरेने घेतले जाऊ शकतात हे खरेच आहे, पण त्यांच्या अंमलबजावणीला निश्चितच जास्त वेळ लागेल. जेव्हा एक व्यक्ती किंवा मूठभर व्यक्ती समूहासाठी निर्णय घेतात, तेव्हा तो निर्णय समूहातील इतरांपर्यंत पोचवावा लागतो. तो त्यांना मान्य नसेल तर त्याची अंमलबजावणी करण्यास त्यांना भाग पाडावे लागते. याला निश्चितच भरपूर वेळ लागणार. याउलट, जर निर्णय-प्रक्रियेत प्रत्येकजण सहभागी असेल, तर तो निर्णय त्यांच्यापर्यंत पोचवण्याचा, किंवा त्याची अंमलबजावणी करण्यास त्यांना भाग पाडण्याचा प्रश्नच नसतो. निर्णय घेण्यास जास्त वेळ लागू शकतो, परंतु एकदा तो घेतला गेला की त्याची अंमलबजावणी वेळेवर होऊ शकते.

निर्णय घेण्याला किती वेळ लागतो हे निर्णय-प्रक्रियेवर अवलंबून नसते, तर संबंधित मुद्दा किती गुंतागुंतीचा आहे यावर ते अवलंबून असते. एखादी कठीण, गुंतागुंतीची बाब असेल तर निर्णय घेण्यास जास्त वेळ लागणारच – मग तो घेण्याची प्रक्रिया कोणतीही असो, आणि तो घेण्यात कितीही लोकांचा सहभाग असो.

**निर्णय-प्रक्रियेबाबत**

जेव्हा सर्व सहभागी व्यक्ती प्रस्तावावरील चर्चेच्या निष्कर्षांना मान्यता देतात, तेव्हा निर्णय घेतले जातात. प्रस्तावाला ज्यांची मान्यता नसते त्यांची

आपल्या शंका-आक्षेप प्रकट करण्याची जबाबदारी असते. प्रत्येक शंकेचे समाधान झाल्याखेरीज निर्णय घेतला जात नाही. जेव्हा चर्चेनंतरही शंका कायम राहतात, तेव्हा मतभिन्नता असणारे लोक, त्या शंका कायम असतानाही, प्रस्तावाला अनुमती देऊन निर्णयाचा मार्ग मोकळा करू शकतात. म्हणजेच, सहमतीचा अर्थ असा नव्हे की सर्वांचे संपूर्ण मतैक्य होते. असे असणे कोणत्याही बुद्धिवान व सर्जनशील व्यक्तींच्या समूहात संभवनीयच नाही, असे म्हटले तरी चालेल.

औपचारिक सहमतीची मांडणी अनेक पातळ्यांवर केली जाते. पहिले पाऊल म्हणजे, प्रत्येकाला त्याचा दृष्टिकोन मांडू देणे. या वेळी शंका-समाधानात समूहाचा वेळ दवडला जात नाही. दुसरे पाऊल म्हणजे, ज्या शंका असतील त्या लक्षात घेणे, त्यांची नोंद करणे. या वेळीही त्यांचे समाधान हा मुद्दा नसतो. या पावलाच्या वेळी अनुशासन पाळण्याची गरज असते. प्रतिक्रियात्मक टीका-टिप्पणी, टवाळखोर टिप्पणी, ठरावांची मांडणी यांच्यामुळे इतरांच्या सर्जनशील कल्पना दाबल्या जाऊ शकतात. तिसऱ्या पातळीपर्यंत ठरावांची मांडणी होणे या रचनेत अभिप्रेत नसते.

प्रत्येक पातळीची व्याप्ती आणि केंद्रबिंदू वेगवेगळे असतात. पहिल्या पातळीवर व्याप्ती जास्त असते. या वेळी मुद्द्याचे तात्त्विक आणि राजकीय परिणाम, त्याचे गुणदोष आणि संबंधित माहिती यांचा चर्चेत विचार केला जाऊ शकतो. पण प्रस्तावाच्या केंद्रबिंदूभोवतीच चर्चा होते. काही निर्णयही या पातळीवर घेतले जाऊ शकतात. दुसऱ्या पातळीवर चर्चा शंकांचा विचार करण्यापुरती मर्यादित असते. शंकांची नोंद या वेळी घेतली जाते, आणि सर्वांपुढे याबद्दलचे एकूण चित्र स्पष्ट होते. तिसऱ्या पातळीवर व्याप्ती आणखी कमी होते. या वेळी फक्त एकेक शंकेच्या निरसनावर भर असतो.

प्रस्ताव संपूर्णपणे विचारात घेऊन टिप्पणी केली जाण्याला प्रोत्साहन दिले जावे – उदाहरणार्थ, संबंधित कल्पना का चांगली आहे, तिच्यासंबंधात कोणत्या प्रश्नांचा विचार करावा लागेल, इत्यादी. या पातळीवर चर्चा अनेकदा सैद्धांतिक स्वरूपाची होऊ शकते. प्रस्तावाचा संपूर्ण समूहावर अंतिमतः काय परिणाम होईल, यामुळे कोणता पायंडा पाडला जाईल, याचा जाणीवपूर्वक विचार होतो. विशिष्ट शंकांचा विचार करण्यापूर्वी प्रत्येक प्रस्तावाचा अशा प्रकारे विचार होणे

उपयुक्त असते. एखाद्या विशिष्ट शंकेपुरती चर्चा मर्यादित होऊ देऊ नये. शंकांची नोंद अवश्य घेतली जावी, परंतु चर्चा संपूर्ण प्रस्तावाच्या विचाराभोवतीच केंद्रित ठेवली जावी. विचारांची-कल्पनांची देवाणघेवाण होण्यास प्रोत्साहन मिळावे. नवी काही माहिती पुढे आली तर तिचा विचार होण्यालाही अवसर असावा. एखादा प्रस्ताव समूहाच्या दृष्टीने चांगला कसा असू शकतो, हे या चर्चेतून मतभिन्नता असणाऱ्यांच्या लक्षात येऊ शकते. त्यांच्या शंका संपूर्ण समूहाच्या जिव्हाळ्याचा विषय असू शकतात. आणि जे प्रस्तावाला सुरुवातीलाच समर्थन देतात, त्यांच्यासाठी प्रस्तावाचा सर्वांगीण विचार करण्याची, संबंधित प्रश्नांचा विचार करण्याची ही वेळ असते.

एखाद्या प्रस्तावाला सामान्यतः मान्यता आहे असे दिसते तेव्हा चर्चेचा समन्वयक, किंवा ज्याला संबंधित अधिकार दिला असतो तो, तो प्रस्ताव सहमतीसाठी बैठकीपुढे मांडू शकतो.

### सहमतीचे आवाहन

समन्वयक विचारतो, "काही शंका अजून शिल्लक आहेत का ?" जर यानंतर कुठलीही शंका पुढे आली नाही तर, थोडा वेळ शांततेत गेल्यानंतर समन्वयक जाहीर करतो की सहमती झालेली आहे, आणि प्रस्तावाचे पुन्हा एकदा वाचन करून त्याची नोंद घेतो. शांततेत किती वेळ जातो हे, सहमती निर्माण होणे किती कठीण होते यावर अवलंबून असणार. निर्णय घेणे सोपे असेल तर हा शांततेचा वेळ अगदी कमी राहील; निर्णय कठीण असेल तर जास्त राहील. यामुळे सर्वांना पुढील कामकाज सुरू करण्यापूर्वी शांतपणे सहमतीचा स्वीकार करणे सोपे जाते. एकदा हे झाले की समन्वयक अंमलबजावणीच्या संदर्भात जबाबदाऱ्यांचे वाटप करतो, किंवा अंमलबजावणीसाठी निर्णय एखाद्या समितीकडे सोपवतो.

एखाद्या प्रश्नाबाबत सहमती आहे काय, किंवा प्रत्येक जणाची संबंधित प्रस्तावाला मान्यता आहे का, हा खरा प्रश्न नाही. अशा प्रकारचे प्रश्न विचारले गेले तर शंका मोकळेपणी व्यक्त होतील असे वातावरण तयार होत नाही. काहींच्या मनात शंका असतील, पण त्या प्रकट करण्यात त्यांना संकोच वाटत असेल; किंवा प्रस्तावाच्या बाजूने प्रचंड बहुमत दिसल्यामुळे त्या प्रकट करण्यात त्यांना भय वाटत असेल, तर "काही शंका अजून शिल्लक आहेत का ?" असा

प्रश्न त्यांना बोलण्याची संधी देतो. काही शंका जर अशा असतील की त्यासाठी त्या बाळगणारे वेगळे राहणे पसंत करीत असतील, तर त्यांची नोंद घेतली जाते व प्रस्तावाला त्यांची जोड दिली जाते.

**औपचारिक सहमतीचे नियम**

(१) एकदा सर्वसहमतीने निर्णय झाला की तो पुन्हा सर्वसहमतीशिवाय बदलता येत नाही. सर्वसहमती नव्याने तयार होत नसेल, तर जुना निर्णय कायम राहतो.

(२) सामान्यत: एका वेळी एकाच व्यक्तीला बोलण्याची अनुमती असते. कोणी केव्हा बोलायचे हे समूहाच्या चर्चेच्या पद्धतीवरून ठरते, किंवा समन्वयक ठरवतो.

(३) कोणी कोणती भूमिका बजावायची, समन्वयाची किंवा चर्चेची पद्धत कोणती असावी, अशासारखे रचनागत निर्णय चर्चेशिवायच सहमतीने घेतले जातात. याबाबत कोणताही आक्षेप आला की संबंधित प्रस्तावात बदल अपरिहार्य ठरतो. जर एखाद्या भूमिकेत कोणाचीही योजना आक्षेपाशिवाय होत नसेल तर त्या भूमिकेसाठी कोणाचीही योजना न करता समूह पुढील कामाला लागतो. जर विभिन्न भूमिका कोणी बजावायच्या किंवा चर्चा वा समन्वयाचे तंत्र कोणते असावे हे ठरवण्यातच खूप वेळ जात असेल, तर याचा अर्थ असा की समूहाच्या समान उद्देशाबद्दलच चर्चेची गरज आहे; असा वेळ कां जावा, याचाच विचार करण्याची गरज आहे. त्या मुद्द्याची जर लगेच चर्चा होऊ शकत नसेल तर तो पुढील बैठकीच्या विषयपत्रिकेवर अवश्य ठेवला जावा.

(४) विषयपत्रिका, समित्यांचे अहवाल, सूचना अशा संबंधात चर्चेनंतरच सर्वसहमतीने निर्णय घेतले जातात. सहमतीपर्यंत येण्यापूर्वी मोकळेपणे त्यासंबंधात चर्चा व्हायला हवी.

(५) प्रस्तावाबाबतचा आक्षेप समूहाने स्वीकारलेल्या तत्त्वांच्या आधारेच घेतलेला असावा. तरच सहमती-निर्मितीत अडथळा आणणे समर्थनीय ठरू शकेल.

(६) औपचारिक सहमतीचा उपयोग करणाऱ्या प्रत्येक बैठकीचे मूल्यांकन अवश्य केले जावे.

## विवाद आणि सहमती

सामान्यतः मानले जाते की विवादांमुळे एखाद्या मुद्द्यावर सर्वमान्य निर्णयाप्रत येण्यात अडचण येते, आणि शांतिमय संबंधांमध्ये बाधा येते. मात्र, औपचारिक सहमतीच्या सिद्धांतात मानले जाते की अहिंसक विवाद आवश्यक आणि इष्टही असतात. त्यांच्यामुळे सुधारणेला वाव मिळतो. विवाद किंवा मतभिन्नता अपेक्षितच असतात, आणि स्वागतयोग्यही असतात, याची जाण सर्व सहभागी व्यक्तींमध्ये निर्माण करणे हे आव्हान असते. विवाद कधीही टाळू नयेत, किंवा दाबून टाकू नयेत. निर्भयपणे मतभिन्नता प्रकट करता येईल असे वातावरण निर्माण केले पाहिजे. आक्षेप आणि टीका यांच्याकडे प्रस्तावावरील हल्ला किंवा तो हाणून पाडण्याची चाल म्हणून न पाहता, अशी रास्त शंका म्हणून पाहिले जावे, जिच्या निरसनामुळे प्रस्तावाला बळकटीच येईल.

विवादांबद्दल अशी समज कदाचित समूहात सहजपणे मान्य होणार नाही. आपणा सगळ्यांवर समाजातून असेच संस्कार झाले आहेत. म्हणून मतभिन्नता निर्भयपणे व कटुता न बाळगता प्रकट होतील असे वातावरण निर्माण करणे सोपे जाणार नाही. मात्र ते केले जाऊ शकते. त्यासाठी सहनशीलता आणि प्रयोग करण्याची तयारी लागेल. शिवाय, विवादांच्या निराकरणासाठी सोबत काम करण्याशी असलेल्या बांधिलकीचा आधार असलेली मूल्ये व तत्त्वे स्पष्टपणे परिभाषित करावी लागतील, आणि सर्व संबंधितांनी ती मान्य करावी लागतील.

एखादा समूह जेव्हा सर्वसहमतीची निर्णय-प्रक्रिया स्वीकारतो, तेव्हा त्याचे पहिले पाऊल असते उद्देशांची मांडणी – किंवा त्या समूहाचे संविधान म्हणा ना. या दस्तावेजात समूहाच्या उद्देशासोबतच समूहाची तत्त्वे व मूल्ये यांची मांडणी असेल. समूहाने जर आपल्या तात्त्विक आधाराची प्रथम चर्चा करून तो शब्दबद्ध केला तर नंतर समूह आणि व्यक्ती यांच्या चिंतांमधला विरोध समजणे सोपे जाते.

औपचारिक सहमतीची आधारभूत तत्त्वे खालीलप्रमाणे आहेत. या तत्त्वांशी बांधिलकी आणि / किंवा ती विकसित करण्याची तयारी आवश्यक आहे. या तत्त्वांना समूह आपल्या उद्देशानुरूप आणखी काही विशिष्ट तत्त्वे व मूल्ये यांची जोड देऊ शकतो.

## सहमतीचे आधार

समूहातील व्यक्तींमध्ये परस्परांबद्दल विश्वास व आदर वाढीस लावेल, आणि त्यांच्यातील कौशल्यांच्या आदान-प्रदानाला चालना देईल अशा वातावरणात सहमती-निर्मितीची प्रक्रिया चालवली गेली तर सहमती फलदायी ठरेल.

*(१) विश्वास :* विश्वासाची गरज सर्वांत जास्त असते. थोडाफार विश्वास असल्याशिवाय परस्पर-सहकार्य किंवा विवादांचे अहिंसक मार्गांनी निराकरण संभवत नाही. विश्वास वाढीस लागण्यासाठी व्यक्तींनी आपल्या वृत्तींचे परीक्षण करण्याची तयारी ठेवणे आणि नव्या कल्पना स्वीकारण्यासाठी मन खुले ठेवणे इष्ट आहे. परस्परांमधील वैयक्तिक व सांस्कृतिक भेदांचा स्वीकार आणि त्यांची कदर करण्याची तयारी यांतून विश्वास वाढतो. सोबत नीटपणे काम करण्यासाठी मैत्री असणे किंवा एकमेकांचे प्रशंसक असणे आवश्यक नाही. विश्वास विकसित करून सहमतीची प्रक्रिया समूहातील व्यक्तींच्या बौद्धिक आणि भावनिक विकासाला चालना देते.

*(२) आदर :* एकमेकाबद्दल आदर प्रकट करणे ही प्रत्येकाचीच जबाबदारी आहे. जेव्हा एखाद्याचे म्हणणे सगळे ऐकतात, त्याचे बोलणे मधेच कोणी तोडत नाही, त्याच्या कल्पना गंभीरपणे विचारात घेतल्या जातात, तेव्हा आपला आदर केला जात असल्याची त्याची भावना होते. शंका तार्किक असोत की भावनिक, त्यांची कदर केली गेली तर सहमतीच्या निर्मितीसाठी पोषक वातावरण तयार होते. प्रश्न निर्माण करणारी कृती आणि तिचा कर्ता यांच्यात फरक करणे आदर विकसित होण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. कृतीवर अवश्य टीका करावी, कर्त्यावर कधीही करू नये. एखादी व्यक्तीच समस्या असल्याची तुमची भावना असली तरी त्या व्यक्तीवर टीका केल्याने काहीही साध्य होऊ शकत नाही.

*(३) समान उद्देश :* उद्देशांची एकता म्हणजे समूहाची उद्दिष्टे व ध्येयधोरणे यांच्याबद्दलची मूलभूत समज. ती उद्दिष्टे साध्य करण्याचा सुयोग्य मार्ग कोणता, याबाबत निश्चितच वेगवेगळी मते राहतील; मात्र सुरुवात कोठून करायची याबाबत सर्वांचे एकमत असले पाहिजे; त्यांना एकत्र आणणारा आधार असला पाहिजे.

*(४) अहिंसा :* अहिंसक पद्धतीने निर्णय घेणारे त्यांची सत्ता उद्दिष्टप्राप्तीसाठी

वापरताना मतभेदांचा आदर करतात आणि इतरांशी सहकार्य करतात. समूहातील चर्चेत इतरांवर कुरघोडी करण्यासाठी सत्तेचा वापर करणे या वातावरणात हिंसक मानले जाते. इतरांचे मत वळवण्यासाठी तुमचे सत्य मांडणे, याहून जास्त काही करणे अनावश्यक मानले जाते.

*(५) स्वतःचे सक्षमीकरण :* अधिकारपदावरील व्यक्तींवर आणि तज्ञांवर आपल्यातर्फे विचार करण्यासाठी व निर्णय घेण्यासाठी बिनतक्रार अवलंबून राहणे लोकांसाठी सोपे असते. समूहातील सदस्य जेव्हा जाणूनबुजून किंवा अजाणता आपला अधिकार इतरांकडे सोपवतात, तेव्हा ते समूहाच्या निर्णयांना जबाबदार राहत नाहीत. सहमतीची प्रक्रिया सभासदांच्या सक्षमीकरणाला मदत करते, आणि ती त्याच्या विकासावर अवलंबूनही असते. शंका कोणीही उपस्थित करू शकतो. प्रत्येकजण त्यांच्या सर्जनशील समाधानाचा प्रयत्न करतो, आणि प्रत्येक निर्णयाला जबाबदार राहतो. जेव्हा सर्वांच्या सहभागाला प्रोत्साहन दिले जाते तेव्हा प्रक्रियेचे लोकतंत्रात्मक स्वरूप पुष्ट होते.

*(६) सहकार्य :* दुर्दैवाने पाश्चिमात्य समाज स्पर्धेत आकंठ बुडालेला आहे. जेव्हा समूहाची उद्दिष्टे साध्य करण्यापेक्षा वादविवादात विजयी होणे महत्त्वाचे मानले जाते तेव्हा सहकार्य, अशक्य जरी नाही तरी, कठीण नक्कीच बनते. प्रस्ताव किंवा व्यक्तींबद्दलची विरोधाची भावना त्यांच्या शक्तीपेक्षा कमजोरीवर लक्ष केंद्रित करते. याउलट, दुसऱ्यांना मदत करण्याची, आधार देण्याची भावना सहकार्य विकसित करते. सहकार्यात शंका-निरसनाबाबतची समान जबाबदारी गृहीत असते. सहकार्याच्या भावनेतून कल्पना मांडण्यातून विवादांचे निराकरण होण्यात मदत होते. कल्पनांच्या मुक्त आणि सर्जनशील आदान-प्रदानातून सर्वोत्तम निर्णय आपोआप आकाराला येतात.

*(७) विवादांचे निराकरण :* कल्पनांच्या आदानप्रदानातून – मग ते मित्रांमधले का असेना – विवाद निर्माण होतातच. या संदर्भात विवाद म्हणजे केवळ मतभेदाची नोंद असते. मतभेद असणे तसे चांगले किंवा वाईट नसते. वेगवेगळ्या मतांच्या मांडणीतून वृत्ती, गृहीत गोष्टी, योजना यांच्यातील बलस्थाने व कमजोरी पुढे येतात. विवाद नसतील तर स्वतःच्या मतांचा व पूर्वग्रहांचा विचार करण्याची, त्यांचे परीक्षण करण्याची शक्यता कमी असते. एखादा निर्णय सर्वोत्तम

असतो आणि त्याचा शोध घ्यावयाचा असतो, असे नसते; समूहाच्या दृष्टीने काय योग्य होईल याचा शोध घ्यावयाचा असतो. सर्वांना जास्तीत जास्त मान्य कोणता पर्याय होईल याचा शोध घेण्यासाठी सोबत काम करण्याची यासाठी गरज असते. विवादांसाठी कोणालाही दोष देऊ नये. दोष देणे मूलतः हिंसक असते. ते दुसऱ्याच्या प्रतिष्ठेवर आघात करते. दुसऱ्याचे बळ खच्ची करू पाहते. त्याच्यात अपराधी भावना निर्माण करते. त्याला स्वतःचा बचाव करण्यास भाग पाडते. दुरावा निर्माण करते. असे केल्याने समूह विवाद-निराकरणाची आपली क्षमता गमावून बसेल. आपल्याला कोणी दोष देऊ नये म्हणून लोक आपल्या भावना दाबून ठेवतील. कोणत्या भावनेतून विवाद निर्माण झाला हेच जर कळले नाही तर त्याचे निराकरण कसे होणार ? विवादांनी विकासाला मदतच होते. सर्जनशील उपाय शोधण्यासाठी त्यांचा उपयोग करायला शिकले पाहिजे. त्यांच्यातून एकमेकांबद्दलची समजही वाढू शकते. धीर धरण्याची गरज असते. तो असला तर कोणीही सर्जनशीलतेने विवादांचे निराकरण करू शकतो. आपल्या सदस्यांना असे करण्यात समूहाने मदत केली पाहिजे. त्यांच्या प्रयोगशीलतेला यासाठी वाव दिला पाहिजे. याबाबतच्या कौशल्याचे समूहाने सतत मूल्यांकन केले पाहिजे आणि हे कौशल्य वाढवले पाहिजे.

*(८) समूहाशी बांधिलकी :* समूहात सामील होताना प्रत्येक सदस्य समूहातील इतरांबद्दल आदर व सद्भावना ठेवण्याची, प्रामाणिकपणे वागण्याची जबाबदारी स्वीकारत असतो. व्यक्तीच्या इच्छांपेक्षा समूहाच्या गरजांना झुकते माप देण्याची गरज प्रत्येकाला मान्य असेल अशी अपेक्षा असते. अनेकजण समूहात सहभागी होतात, परंतु आत्मकेंद्रित राहतात. मात्र इतरांची मते लक्षात घेऊन उपाय शोधण्याची समान जबाबदारी टाळून चालत नाही.

*(९) सक्रिय सहभाग :* आपले सर्वोत्कृष्ट विचार व्यक्त करण्याचा आपला अधिकार कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. स्वतःसाठी काय चांगले, काय वाईट हे आपणच ठरवतो. सहमतीची प्रक्रिया स्पर्धात्मक नसून समन्वयात्मक असते, म्हणून सर्व प्रामाणिक टीका-टिप्पणी मोलाची असते. कल्पना जर त्या मांडणाऱ्याची व्यक्तिगत संपत्ती समजल्या गेल्या, आणि लोक आपापल्या कल्पनांना घट्ट चिकटून बसले, तर सहमती निर्माण करणे अत्यंत कठीण जाईल. आग्रहीपणा, मनाची कवाडे बंद करणे, स्वामित्व-भावना यांतून वादविवाद

होतात आणि सहमतीच्या प्रक्रियेत खंड पडतो. प्रत्येकाचे योगदान ज्यात मोलाचे मानले जाते अशा वातावरणाची निर्मिती केल्याने परस्पर-विश्वास वाढतो, आणि सर्वांचा सक्रिय सहभाग शक्य होतो. योग्य प्रोत्साहन दिले गेले तर प्रत्येक व्यक्तीचे ज्ञान, अनुभव, जबाबदारीची जाणीव आणि क्षमता यांची वाढ होऊ शकते आणि ती अधिक चांगल्या प्रकारे सहभागी होऊ शकते.

*(१०) सत्तेत समान प्रवेश-सुलभता :* व्यक्तींमध्ये भेद असतात – त्यांचे अनुभव, वृत्ती, सामाजिक संस्कार, माहिती मिळण्याची संधी यांत भेद असतात. राजकीय विषमताही असते. त्यामुळे काही जणांजवळ इतरांपेक्षा जास्त सत्ता असणे ओघानेच येते. या विषमतेवर तोडगा हाच की प्रत्येकाने जाणीवपूर्वक आणि कल्पकतेने सत्ता, कौशल्ये आणि माहिती इतरांसोबत वाटून घेण्याचा प्रयत्न करावा. काही व्यक्तींना इतरांवर अलोकतांत्रिक सत्ता गाजवण्याची संधी देणाऱ्या उतरंडीसारख्या रचना टाळाव्या. समतावादी आणि जबाबदार रचना सत्तेत प्रवेश समान रूपाने सुलभ करतात.

*(११) धीर :* सहमतीच्या प्रक्रियेत घाई कामाची नाही. कधीकधी सहमती सहजपणे निर्माण होते. कधीकधी कठीण परिस्थितीत कल्पनांचे नीट आदान-प्रदान शक्य करण्यासाठी जास्त वेळ द्यावा लागतो. अशावेळी तणावपूर्ण, अधीर, हट्टी किंवा आक्रमक वर्तनापेक्षा धीर जास्त उपयोगी ठरतो. प्रत्येक व्यक्ती जोपर्यंत धीराने व मर्यादेने वागेल तोपर्यंत सहमती शक्य आहे.

**समन्वयकाची भूमिका**

सहमतीची प्रक्रिया नीटपणे चालावी या दृष्टीने चर्चा चालवणे हे समन्वयकाचे काम असते. ही भूमिका प्रत्येक बैठकीत वेगळ्या व्यक्तीला दिली तर याबाबतचे कौशल्य प्रत्येकात विकसित होऊ शकेल. प्रत्येकात जर समन्वयकाच्या भूमिकेची जाण असेल तर बैठकीतील चर्चा व्यवस्थित चालू शकतील. दोन किंवा जास्त व्यक्तींवर समन्वयाचे काम सोपवणे जास्त बरे. यांपैकी एक पुरुष व एक स्त्री असेल तर बैठक जास्त संतुलित होईल. दोन समन्वयकांपैकी एक जास्त अनुभवी असेल तर दुसऱ्याला त्याच्यापासून शिकता येईल. बैठकीत वेगवेगळी तंत्रे वापरणे उपयुक्त असते. आणि दीर्घकाळ चाललेल्या तणावपूर्ण बैठकीत थोडासा हास्यविनोद तणाव कमी करण्यासाठी खूपच उपयोगी ठरतो हेही लक्षात घेतले पाहिजे.

## सद्‌भावना

सद्‌भावना नेहमी राखली पाहिजे. बैठकीतील प्रत्येक विधान आणि प्रत्येक कृतीमागे समूहाच्या भल्याची भावना आहे असेच मानले पाहिजे. समूहाचा उद्देश प्रत्येक सभासदाला माहीत आहे आणि बैठकीची विषयपत्रिका त्याला मान्य आहे असेही मानले पाहिजे. अनेकदा आपण आपल्या भावना आणि अपेक्षांचे जेव्हा इतरांवर आरोपण करतो तेव्हा आपण त्यांच्या कृतींना प्रभावित करतो. आपण जर असे मानू की इतर सभासद स्वतःकडे इतरांचे लक्ष तेवढे खेचू पाहत आहेत; बैठकीला सुरुंग लावण्याची, कुरापती काढण्याची त्यांची इच्छा आहे, तर अनेकदा ते तसेच वागतील यात शंका नाही.

विवादाचे निराकरण होईल असे आपण मानले तर ते होण्याची शक्यता बळावते. कोणी जर मुद्दाम त्रास देऊ पाहत असेल किंवा दूषित वृत्तीचा असेल तर हे जास्तच खरे ठरते. व्यक्तीवर हल्ला करू नये; उलट, तिच्याबद्दल सद्‌भावना राखावी आणि तिला सांगावे की तुझे म्हणणे व तुझ्या कृती समूहाच्या हिताच्या कशा आहेत हे स्पष्ट कर. कृती आणि कर्ता यांत फरक केलाच पाहिजे. एखाद्या व्यक्तीचे वर्तन मान्य होण्यासारखे नसेल, परंतु ती व्यक्ती वाईट असेल असा त्याचा अर्थ नाही. म्हणून व्यक्तींवर त्याच्या वर्तनाला घेऊन दोषारोपण करू नये. लक्षात ठेवावे की कोणापाशीच उत्तर नाही. सर्वांना समाधान होईल असे सर्व शंकांचे निरसन जिच्यामुळे होईल अशी सर्जनशील प्रक्रिया शोधणे हे समूहाचे काम आहे.

## सामाईक दृष्टीची मांडणी

व्यक्ती सार्वभौम आहे, पण त्याच वेळेस ती समूहाला व्यक्तिशः जबाबदार आहे, ह्याची आम्हाला जाण आहे. एक समूह म्हणून मुक्त व प्रामाणिक विचार-विनिमयाशी आमची बांधिलकी आहे. विवाद आणि मतभेद जेथे मोकळेपणे व निर्भयपणे प्रकट केले जातील असे वातावरण आम्ही सगळे मिळून निर्माण करू शकतो.

व्यक्तिगत पातळीवर आम्ही अहिंसेचे पालन करतो. विवादांचे अहिंसक उपायांनी निराकरण करण्याची क्षमता वाढवण्याचा आमचा व्यक्तिगत स्तरावर, तसेच समूहाच्या स्तरावर सतत प्रयत्न असतो.

साध्या राहणीशी आमची बांधिलकी आहे. आम्ही स्वतःला कोणा व्यक्तीचे,

वस्तूचे मालक मानत नाही. समविचारी लोकांशी आमचे मोकळे, प्रामाणिक, समतेचे, एकमेकांच्या स्वातंत्र्याचा आदर करणारे संबंध आहेत. आम्ही सगळे विद्यार्थी आहोत, आणि शिक्षकही. आमच्यावर अवलंबून असणाऱ्यांना आम्ही विनाशर्त आधार देतो. आम्ही पृथ्वीची आणि तिच्या सगळ्या नात्यांची काळजी घेतो. टिकाऊ व्यवस्थांसाठी आमचा नेहमी प्रयत्न असतो.

आमच्या समुदायात आम्ही प्रामाणिकपणा आणि विश्वास, अहिंसा आणि स्व-सक्षमीकरण, समता आणि लोकशाही यांच्यावर आधारलेली समाज-रचना निर्माण करीत आहोत. आम्ही व्यापक समाजाच्या पोटातील पर्यायी समाज आहोत, जो शांतीच्या स्थापनेसाठी प्रयत्नशील आहे. आजच्या समाजाकडे आम्ही पाठ फिरवीत नाही; आम्ही तर समाजाची आशा आणि समाजाचे भविष्य आहोत.

**सामाईक तत्त्वे**

खाली काही शब्द आणि शब्दसमूह दिले आहेत. ते आमच्या दृष्टिकोनाशी संबंधित आहेत. प्रत्येक सदस्याने त्यांची व्याख्या करावी अशी अपेक्षा असते. या व्याख्या विकसित होतील आणि समूहाचे मानस अधिक समर्पकपणे व्यक्त करतील.

- सामान्य एकता
- कृतीवर विश्वास
- व्यक्तीचे सार्वभौमत्व
- व्यक्तिगत जबाबदारी
- समुदाय
- सामूहिकता
- बांधिलकी
- मुक्त व प्रामाणिक आदान-प्रदान
- मुक्त व सुरक्षित वातावरणाची निर्मिती
- विवाद
- अहिंसा
- विवादांचे हिंसेशिवाय निराकरण करण्याची क्षमता

- साधी राहणी
- अपरिग्रह
- प्रामाणिकपणा
- समता
- समविचारी लोकांशी संबंध
- सर्वजण विद्यार्थी व शिक्षक
- आपल्यावर अवलंबून असणाऱ्यांना विनाशर्त मदत
- पृथ्वीची व तिच्या नातेसंबंधांची काळजी
- टिकाऊ व्यवस्था
- प्रामाणिकपणा व विश्वास, अहिंसा आणि स्व-सक्षमीकरण, समता आणि लोकशाही यांच्यावर आधारित समाज-रचना.
- पर्यायी समाज
- दृष्टी
- शांति-स्थापना
- समाजाची आशा व भविष्य

**क्रांतिकारी निर्णयप्रक्रिया**

देशात सामाजिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रात मोठा बदल ज्यामुळे घडून येईल असा एकच मुद्दा सांगायला तुम्हाला सांगण्यात आले तर तुम्ही कोणता मुद्दा निवडाल ? बहुसंख्य लोक आपला आवडता मुद्दा निवडतील – नागरी अधिकार, नि:शस्त्रीकरण, पर्यावरणाची चिरंतनता, किंवा असाच एखादा मुद्दा. काहीजण भांडवलदारी व्यवस्थेची जागा घेण्यासाठी एखादी विचारधारा सुचवतील – उदाहरणार्थ, समाजवाद किंवा ग्रीन पार्टीची विचारधारा. परंतु फार थोड्या लोकांच्या मनात समूहातील परस्परसंबंधांचे गतितत्त्व (समूहात एकमेकांच्या संपर्कात असताना लोकांची परस्परांकडे पाहण्याची व परस्परांशी वागण्याची पद्धती) बदलण्याचा विचार येईल. किंवा अधिक स्पष्ट शब्दांत सांगायचे तर, निर्णय-प्रक्रिया बदलण्याचा विचार.

*मात्र, क्रांतिकारी परिवर्तनाची किल्ली आहे, प्रक्रिया.* ही काही नवी गोष्ट

आहे अशातला भाग नाही. अनेक द्रष्ट्यांनी याकडे लक्ष वेधले आहे. परंतु हा धडा शिकणे जड जाते. १९७१-८० या दशकातच स्त्री-मुक्तिवाद्यांनी सांगितले होते की खरा बदल होण्याच्या मार्गातला सगळ्यात मोठा अडथळा आहे, समूहातील विचार-विनिमयाची आणि निर्णय घेण्याची पर्यायी प्रक्रिया नसणे – पुरोगामी संघटनांमध्ये आणि व्यापक समाजामध्येही. पुरोगामी लोकांच्या दृष्टीने अनेक बाबतीत प्रगती झाली असली तरी लोकांची एकमेकांकडे पाहण्याची, एकमेकांशी वागण्याची पद्धत फारशी बदललेली नाही; आणि निर्णय-प्रक्रियेत तर काहीच बदल झालेला नाही.

समूहातील परस्पर-वर्तनाबाबत काही गोष्टींची आपल्याला सवय झाली आहे. त्यांतील एक आहे स्पर्धेचे तत्त्व, ज्यामुळे आपण मानून घेतो की कोणाची तरी हार होणारच आहे. दुसरी गोष्ट आहे, उतरंडीसारखी रचना, ज्यामुळे मूठभरांच्या हाती सत्ता एकवटते. तिसरी गोष्ट आहे, दुसऱ्यांवर सत्ता गाजवण्याची, त्यांना नियंत्रणात ठेवण्याची तंत्रे, ज्यामुळे सर्वच संबंधितांच्या माणुसकीचा ऱ्हास होतो आणि त्यांच्यात दुरावा निर्माण होतो. यांना पर्याय अजून आपल्या समाजात पुरेशा प्रमाणात विकसित झालेले नाहीत.

समूहाचे ध्येय किंवा राजकीय तत्त्वज्ञान कोणतेही असो, तो काम करण्यासाठी कोणत्या-ना-कोणत्या प्रक्रियेचा वापर करतोच. जवळपास सगळ्याच समूहांमध्ये उतरंडीसारखी रचना असते; बहुतेक सगळेच समूह स्पर्धा स्वाभाविक मानून, किंबहुना इष्ट सुद्धा मानून, स्वीकारतात; आणि आपल्या सदस्यांना नियंत्रणात ठेवण्याचे भरपूर प्रयत्न करतात. ही मोठी लक्षणीय गोष्ट आहे की विभिन्न समूहांची दृष्टी आणि मूल्ये वेगळी असली, त्यांच्यात विरोध असला, तरी संपर्क आणि निर्णयाबाबतच्या रचना आणि तंत्रे सारखी असतात. नाटकातील पात्रांनी एकसारखा वेष केला आणि संवादाऐवजी अनाकलनीय बडबड केली, तर प्रेक्षकाला त्यांच्यात फरक करता येईल का ?

मग, पर्यायी क्रांतिकारी निर्णय-प्रक्रिया कशी असेल ? पहिली गोष्ट, स्पर्धेची जागा सहकार्य घेईल. याचा अर्थ, स्पर्धा पूर्णपणे टाळायची असा नाही. पण तुम्ही कोणत्याही खेळाच्या प्रशिक्षकाला विचारा की संघाच्या विजयाची किल्ली कशात आहे ? तो उत्तर देईल, ''संघामधील परस्पर-सहकार्य.'' बदल हा करायचा की

स्पर्धेचा उपयोग विजयासाठी – किंवा दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर दुसऱ्याला नष्ट करण्यासाठी, त्याच्यावर सत्ता गाजवण्यासाठी – न करता आपल्यात अधिकाधिक सुधारणा घडवून आणण्यासाठी करायचा. तुम्हाला एखादी गोष्ट जितकी चांगली करता येईल तितकी करायची. त्यासाठी दुसऱ्यावर हल्ला करण्याची गरज नसते. खरे म्हणजे, दुसऱ्याला एखादी गोष्ट चांगली करण्यासाठी जेव्हा तुम्ही मदत करता तेव्हा तुमची ती गोष्ट अधिक चांगली करण्याची क्षमता वाढते. आणि समूहातील सहकारवृत्तीचा परिणाम तर असा होतो की समूहातील व्यक्तींच्या या क्षमतेच्या बेरजेपेक्षा समूहाची क्षमता जास्तच होते.

सहकार्य म्हणजे काही केवळ 'जगा आणि जगू द्या' नव्हे. सहकार्य म्हणजे दुसऱ्याचा दृष्टिकोन समजून घेण्याचा प्रयत्न करणे. दुसऱ्याच्या दृष्टिकोनाची तुमच्या दृष्टिकोनाशी सांगड घालणे, ज्यायोगे एक नवाच दृष्टिकोन आकार देईल. सहकार्य म्हणजे, तात्पुरता का होईना, अविश्वास बाजूला ठेवणे, ज्यायोगे इतरांच्या विचारातील सत्याचे तुम्हाला दर्शन होईल. सहकार्य ही सर्जनशीलता, समन्वय आणि मुक्त मनाची प्रक्रिया आहे, जिच्यातून विश्वास वाढतो, परस्परसंबंध दृढ होतात, परस्परांबद्दलची समज अधिक सुजाण होते, आणि शेवटी एक अधिक सशक्त, निरोगी आणि यशस्वी समूह विकसित होतो.

पुढचे पाऊल आहे, अशा संघटनेची निर्मिती जी उतरंडीसारखी नसेल, तर समतामूलक असेल. तिच्याशी संबंधित रचनेत सहभागी लोकशाही, कौशल्यांचा विकास, माहितीची देवाणघेवाण, सर्वांना नेतृत्वाची संधी, सातत्यपूर्वक मूल्यांकन, आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे सत्तेत समान प्रवेश-सुलभता, या गोष्टी असतील. उतरंडीसारख्या रचना या समस्या असतातच असे नाही. परंतु त्यांच्यामुळे मूठभरांच्या हाती सत्ता एकवटते, आणि ते मूठभर लोकांपासून अधिकाधिक दुरावत जातात – ज्या लोकांवर त्यांच्या निर्णयांचा सर्वाधिक परिणाम होणार असतो त्यांच्यापासून. समूहामध्ये – आणि समाजामध्येही – एक सत्ताधारी वर्ग निर्माण होतो. समतामूलक रचनेत प्रत्येकाला अधिकारप्राप्तीची समान संधी असते, आणि प्रत्येक अधिकारपद सर्वांना उत्तरदायी असते.

याचा अर्थ असा नव्हे की कोणी नेता नसतोच. परंतु नेते आपली कौशल्ये व आपल्याजवळची माहिती यांत इतरांना सहभागी करून घेतात. नेतृत्व हा काही

वैयक्तिक गुण नव्हे, तर समूहाने या भूमिकेला बळ दिले आहे याची जाणीव ते राखतात. ज्या समूहात बहुतांश किंवा सर्वच सदस्य नेतृत्वाची कोणतीही भूमिका बजावू शकतात, त्या समूहावर किंवा त्या समूहाअंतर्गत सत्ता सहजपणे गाजवली जाऊ शकत नाही.

समूहातील प्रक्रियेत क्रांतिकारी बदल घडवून आणणारी शेवटची आणि सर्वांत दृश्य गोष्ट म्हणजे समूहातील सदस्यांचे परस्परांशी असलेले संबंध, त्यांचे परस्परांशी वर्तन. अधिकार गाजवण्याची वृत्ती, इतरांना नियंत्रणात ठेवू पाहणारे वर्तन कधीही सहन केले जाणार नाही. लोक इतरांशी आदराने वागतील आणि या वर्तनाच्या परतफेडीची अपेक्षा करतील. समूहासाठी सर्वोत्तम निर्णय घेतले जावेत यासाठी प्रत्येकजण व्यक्तिशः प्रयत्नांची पराकाष्ठा करेल. दिखाऊपणा, पक्षपात यांना स्थान राहणार नाही. विवादांकडे विकासाची, विचाराचे क्षितिज व्यापक करण्याची, माहितीचे आदान-प्रदान करण्याची, प्रत्येकाचा दृष्टिकोन विचारात घेऊन नवे उपाय शोधून काढण्याची संधी म्हणून पाहिले जाईल. समूह असे वातावरण निर्माण करील, ज्यात प्रत्येकाच्या सहभागाला प्रोत्साहन दिले जाईल, विवाद व मतभेद मोकळेपणे प्रकट होतील आणि प्रत्येकाच्या भल्याचे असलेले निर्णय घेतले जातील. आणि ही गोष्ट निर्विवादपणे क्रांतिकारी असेल.

**परिशिष्ट :**

# महात्मा गांधींच्या 'हिंदस्वराज्य' (१९०९) पुस्तकातील निवडक अंश

## प्रकरण ५ : इंग्लंडची स्थिती

**वाचक :** तर मग तुमच्या बोलण्यावरून मी असे अनुमान करतो की इंग्लंडची राज्यपद्धती बरोबर नाही आणि आपल्याला ती इष्टही नाही.

**संपादक :** तुमचे अनुमान बरोबर आहे. इंग्लंडात आज जी स्थिती आहे ती खरोखर दयाजनक आहे, आणि माझे तर ईश्वरापाशी मागणे आहे की तशी स्थिती हिंदुस्तानची कधी न होवो. तुम्ही ज्याला पार्लमेंटची माता म्हणता ते इंग्लंडचे पार्लमेंट वांझोटे आहे आणि वेश्या आहे. हे दोन्ही शब्द कडक असले तरी त्याला बरोबर लागू पडणारे आहेत. मी त्याला वांझोटे म्हटले, कारण की आजपर्यंत पार्लमेंटाने आपण होऊन एकसुद्धा चांगले काम केलेले नाही. त्याच्यावर बाहेरून दडपण आणणारे कोणी नसेल तर ते काहीच करणार नाही अशी त्याची स्वाभाविक स्थिती आहे. आणि ते वेश्या अशासाठी म्हणायचे की जे प्रधानमंडळ त्याला हातात ठेवील त्याच्यापाशी ते राहते. आज त्याचा धनी ॲस्किथ, तर उद्या बाल्फोर, तर परवा तिसरा कोणी.

**वाचक :** हे तुम्ही उपरोधाने बोललात. वांझोटे हा शब्द कसा लागू होतो ते तुम्ही दाखविले नाही. पार्लमेंट हे लोकांनी बनविलेले असते, अर्थात् ते लोकांच्या दाबाखालीच काम करणार हे उघड आहे. तोच त्याचा गुण आणि त्यावरचा अंकुश आहे.

**संपादक :** हा एक मोठा भ्रम आहे. पार्लमेंट जर वांझोटे नसेल तर काय झाले पाहिजे ? लोक त्यात उत्तमात उत्तम सभासद निवडून पाठवितात; सभासद पगार न घेता, म्हणजेच लोककल्याणाकरिता, तेथे जातात असे झाले पाहिजे. लोक स्वत: शिक्षित म्हटले जातात, तेव्हा ते चूक करणार नाहीत असे आपण समजले पाहिजे. अशा पार्लमेंटकडे अर्ज पाठविण्याचे काय कारण ? त्यावर दडपण आणण्याचे काय कारण ? त्या पार्लमेंटचे काम इतके सरळ असले पाहिजे की

दिवसेंदिवस त्याचे तेज अधिकाधिक पडावे आणि लोकांवर त्याचा परिणाम होत जावा. त्याच्याऐवजी एवढे सर्वच जण मान्य करतात की, पार्लमेंटचे सभासद दांभिक आणि स्वार्थी आढळतात. प्रत्येकजण आपल्या पोळीवर तूप ओढून घेतो. केवळ भीतीमुळेच पार्लमेंट काही काम करते. आज केले ते उद्या रद्द करावे लागते. एकही गोष्ट आजपर्यंत पार्लमेंटने निकालात काढली आहे असे उदाहरण आढळत नाही. मोठ्या प्रश्नांची चर्चा पार्लमेंटात चालू असेल तर त्या वेळी सभासद हातपाय ताणून बसतात किंवा बसल्या बसल्या डुलक्या घेतात. त्या पार्लमेंटात सभासद असा आरडाओरडा करतात की ऐकणारे त्रस्त होऊन जातात. एक महान इंग्रज लेखक कार्लाइल याने त्याला 'जगाचा बडबडखाना' (A talking shop of the world) असे नाव दिले आहे. सभासद ज्या पक्षाचे असतील त्या पक्षाला विचार न करता मत देतात, तसे द्यायला ते बांधलेले असतात. त्यात कोणी अपवाद म्हणून निघाला तर त्याची शंभर वर्षे भरलीच समजा. जितका वेळ आणि पैसा पार्लमेंट खर्चते तितका वेळ व पैसा जर काही थोड्या चांगल्या माणसांना मिळाला तर लोकांचा उद्धार होईल. हे पार्लमेंट लोकांचे एक खेळणेच आहे, आणि हे खेळणे लोकांना फार खर्चात टाकते. हे फक्त माझे स्वत:चे विचार आहेत असे तुम्ही समजू नका. मोठमोठ्या विचारवंत इंग्रजांनी असे विचार मांडले आहेत. एका सभासदाने तर असे म्हटले आहे की, पार्लमेंट धार्मिक वृत्तीच्या माणसाच्या लायकीचे राहिलेले नाही. दुसऱ्या एका सभासदाने पार्लमेंट हे मूल ('बेबी') आहे असे म्हटले आहे. मूल हे सदोदित मूलच राहिलेले तुम्ही कधी बघितले आहे काय ? आज सातशे वर्षांनंतरसुद्धा जर पार्लमेंट मूलच राहिले असेल तर ते मोठे होणार केव्हा ?

**वाचक :** तुम्ही मला विचार करायला लावलेत. हे सर्व मी एकदम कबूल करावे असे तर तुम्ही खासच म्हणणार नाही. अगदी वेगळे विचार तुम्ही माझ्या मनात उत्पन्न करीत आहा. ते मला पचवावे लागतील. ठीक आहे. आता त्याला 'वेश्या' कां म्हणालात याचा खुलासा करा.

**संपादक :** तुम्हाला माझे विचार एकदम मान्य होणार नाहीत हे बरोबरच आहे. त्यासंबंधी वाचण्यालायक पुस्तके जर तुम्ही वाचाल तर तुम्हाला काहीशी कल्पना येईल. पार्लमेंटला मी 'वेश्या' म्हटले तेही बरोबर आहे. त्याचा एक कोणी धनी नाही. त्याचा धनी एक कोणी होऊ शकत नाही. पण माझ्या म्हणण्याचा भावार्थ इतकाच नाही. जेव्हा त्याचा धनी कोणी होतो – उदाहरणार्थ पंतप्रधान –

तेव्हा सुद्धा पार्लमेंटची चालचलणूक चंचल राहते. जशी दुर्दशा वेश्येची होते तशीच पार्लमेंटची होते. पंतप्रधानाला पार्लमेंटची पर्वा नसते. तो आपल्या सत्तेच्या तोऱ्यात असतो. आपल्या पक्षाची जीत कशी होईल इकडेच त्याचे सारखे लक्ष लागलेले असते. पार्लमेंटने योग्य काम करावे हा विचार त्याच्या मनात क्वचितच असतो. आपल्या पक्षाला बळकटी आणण्याकरिता पार्लमेंटकडून नाना कामे तो करवून घेत असल्याची उदाहरणे वाटेल तेवढी सापडतात. या सर्वांचा विचार केला पाहिजे.

**वाचक :** आजपर्यंत ज्यांना आपण देशाभिमानी आणि प्रामाणिक माणसे समजत आलो त्यांच्यावरसुद्धा तुम्ही हल्लाच चढवीत आहा.

**संपादक :** होय, हे खरे आहे. मला काही पंतप्रधानांचा द्वेष नाही. पण अनुभवाने मला असे दिसून आले आहे की, त्यांना खरे देशाभिमानी म्हणता येणार नाही. लौकिक अर्थाने ज्याला आपण लांच म्हणतो ती ते उघडपणे घेत-देत नाहीत म्हणून त्यांना प्रामाणिक म्हणायचे असेल तर खुशाल म्हणावे. पण त्यांच्याकडे वशिला पोचू शकतो. ते इतरांकडून काम करवून घेण्याकरिता पदव्यांची वगैरे लांच पुष्कळ देतात. शुद्ध भाव आणि शुद्ध प्रामाणिकपणा त्यांच्यात नसतो असे मी छातीठोकपणे म्हणू शकतो.

## प्रकरण १६ : शस्त्रबळ

**वाचक :** भयाने दिलेली वस्तू भय असेल तोपर्यंतच टिकते, ही आणखी एक विचित्र गोष्ट तुम्ही सांगितलीत. दिले ते दिले, त्यात आणखी पुन्हा काय बदल होणार ?

**संपादक :** असे नाही. १८५७ सालचा जाहीरनामा काढण्यात आला तो बंडाच्या शेवटी, लोकांत शांतता टिकविण्याकरिता म्हणून. जेव्हा शांतता झाली आणि लोक भोळसट बनले तेव्हा त्या जाहीरनाम्याचा अर्थ बदलला. मी जर शिक्षेच्या भीतीने चोरी करीत नसलो तर शिक्षेची भीती जाताच मला चोरी करावीशी वाटू लागेल आणि मी पुन्हा चोरी करीन. हा अगदी रोजचा अनुभव आहे; त्यात नाकबूल करण्यासारखे काही नाही. भीती दाखवून लोकांकडून काम करून घेता येते असे आपण गृहीत धरले आहे, आणि म्हणून तसे आपण करीत आलो आहोत.

**वाचक :** तुम्ही जे हे सांगत आहा ते तुमच्या विरुद्ध जाते हे तुमच्या लक्षात येत नाही काय ? इंग्रजांनी स्वत: जे काही मिळविले ते शस्त्रबळाने मिळविले आहे हे तुम्हाला कबूल करावे लागेल. त्यांनी जे काय मिळविले ते कुचकामाचे आहे, असे तुम्ही म्हणालात, ते माझ्या स्मरणात आहे. पण त्याने काही माझ्या म्हणण्याला धक्का लागत नाही. त्यांनी कुचकामाचे मिळविण्याचेच योजिले आणि ते मिळविले. तात्पर्य की त्यांनी आपले योजलेले पार पाडले. साधन काय होते त्याची चिंता कशाला ? आपला उद्देश जर चांगला असला तर तो आपण वाटेल त्या साधनांनी, हिंसेने देखील, पार पाडू नये काय ? चोर जर माझ्या घरात शिरला तर मी काय साधनांचा विचार करीत बसेन ? वाटेल ते करून त्याला पळवून लावणे हेच माझे कर्तव्य आहे.

अर्ज-विनंत्या करून आपल्याला आतापर्यंत काही मिळाले नाही आणि मिळणार नाही हे तुम्हाला कबूल आहे असे मला वाटते. तर मग मारून कां घेऊ नये ? आवश्यक वाटेल तेवढी माराची भीती नेहमी कायम ठेवू. मूल जर आगीत पाय टाकू लागले तर त्याला वाचविण्याकरिता त्याला रोखण्यात तुम्हाला दोष दिसू नये. कशी का होईना, आपल्याला कार्यसिद्धी करून घ्यायची आहे.

**संपादक :** तुम्ही युक्तिवाद बरा मांडलात. असल्या युक्तिवादाने बरेच जण फसले आहेत. मीसुद्धा असाच युक्तिवाद करीत असे. पण आता माझे डोळे उघडले आहेत आणि मला माझी चूक दिसत आहे. तुम्हाला ती दाखवून देण्याचा मी प्रयत्न करतो.

पहिल्यांदा, इंग्रजांनी जे मिळविले ते हिंसेने मिळविले, म्हणून आपणसुद्धा तसेच करून मिळवू या, हा तुमचा विचार घेऊ. इंग्रजांनी पाशवी शक्तीचा वापर केला आणि आपल्यालाही तो करता येईल, हे तुमचे म्हणणे बरोबर आहे. पण त्यायोगे त्यांना जे मिळाले तेच आपल्याला मिळेल. ते तर आपल्याला मुळीच नको हे तुम्ही मान्य कराल.

साधन आणि साध्य यांच्यामधे संबंध नाही ही तुमची समजूत फार चुकीची आहे. त्या चुकीमुळे धर्मपरायण म्हणून समजल्या जाणाऱ्या लोकांनीसुद्धा घोर कर्मे केली आहेत. हे तर धोतऱ्याचे रोप लावून मोगऱ्याच्या फुलांची इच्छा बाळगण्यासारखे आहे. समुद्र तरून जावयाचा तर साधन जहाज हेच होऊ शकेल.

त्याऐवजी जर मी बैलगाडी पाण्यात घातली तर गाडी आणि मी, दोघेही तळ गाठू. जसा देव तशी पूजा, हे फार विचार करण्यासारखे वाक्य आहे. त्याचा चुकीचा अर्थ करून लोक घोटाळ्यात पडले आहेत. साधन हे बीज आहे आणि साध्य हे झाड आहे. अर्थात् बीजाचा आणि झाडाचा जसा संबंध तसाच आणि तितकाच संबंध साधन आणि साध्य यांच्यात आहे. सैतानाची भक्ती करून ईश्वरभजनाचे फळ मिळणे शक्य होणार नाही. म्हणजेच, आपण जर असे म्हटले की 'आम्हाला ईश्वराचीच भक्ती करायची आहे, मग साधन सैतान असले म्हणून काय झाले', तर हे म्हणणे अगदी अज्ञानाचे आहे. पेराल तेच उगवेल. इंग्रजांनी अत्याचार करून १८३३ मध्ये मतदानाचे विशेष हक्क मिळविले. अत्याचार केल्याने काय त्यांना आपले कर्तव्य समजले ? त्यांची इच्छा हक्क मिळविण्याची होती, ते त्यांनी मारठोक करून मिळविले. खरे हक्क हे कर्तव्यपूर्तीचे फळ असते, तसे त्यांनी मिळविले नाहीत. परिणाम असा झाला की, सगळेजण हक्क मिळविण्यासाठी धडपडू लागले आहेत, कर्तव्यभावना झोपली आहे. जेथे सगळेच जण हक्काच्या गोष्टी बोलतात तेथे कोण कुणाला हक्क देणार ? ते काहीच कर्तव्य पार पाडीत नाहीत असे म्हणण्याचा माझा हेतू नाही, पण इच्छिलेले हक्क मिळविल्यानंतर ते अंमलात आणण्याचे कर्तव्य त्यांनी पार पाडलेले नाही. हक्काची लायकी त्यांनी मिळविली नाही, त्यामुळे त्यांचे हक्क त्यांच्या गळ्यांत लोढण्यासारखे होऊन बसले आहेत. म्हणजे जे त्यांना मिळाले ते त्यांच्या साधनांचेच फळ आहे. त्यांना जे पाहिजे होते तसली साधने त्यांनी वापरली.

मला तुमचे घड्याळ तुमच्याकडून हिसकून घ्यायचे असेल तर अर्थात् मला तुमच्याशी मारामारी करावी लागेल. पण जर ते विकत घ्यायचे असेल तर मला तुम्हाला त्याचे पैसे द्यावे लागतील. जर ते तुमच्याकडून बक्षीस म्हणून घ्यायचे असेल, तर मला तुमची मनधरणी करावी लागेल. घड्याळ मिळविताना जे साधन वापरले त्याप्रमाणे तो चोरीचा माल, माझ्या मालकीचा माल किंवा बक्षीस असे त्याचे रूप झाले. तीन साधनांचे तीन वेगवेगळे परिणाम झाले. तेव्हा साधनाची पर्वा कशाला, असे तुम्ही कसे म्हणता ?

आता चोराला घालवून देण्याचे उदाहरण घेऊ या. त्याकरिता वाटेल ते साधन वापरावे या तुमच्या विचाराशी मी सहमत नाही. जर माझ्या घरात माझे वडील चोरी करायला आले तर मी एक साधन वापरीन. तेच साधन माझ्या

ओळखीचा कोणी आला तर मी वापरणार नाही. आणि तिसराच कोणी अपरिचित असा माणूस आला तर तिसरे साधन वापरीन. जर तो मनुष्य गोरा असेल तर आपण एक साधन वापरू, हिंदुस्तानी असेल तर दुसरे वापरू, असेही तुम्हीच म्हणाल. एखादा अशक्त पोर चोरी करायला आला तर मी एक साधन वापरीन, माझ्या बरोबरीचा असेल तर वेगळे वापरीन, आणि जर तो माझ्यापेक्षा बलवान असून हत्यारबंद असेल तर मी मुकाट्याने पडूनच राहीन. यात वडिलांपासून थेट बलवानापर्यंत वेगवेगळी साधने वापरावी लागतील. वडील असले तर मी कदाचित् झोपूनच राहीन आणि कोणी हत्यारबंद असला तरी झोपून राहीन. वडिलांमध्येही एक बळ आहे; हत्यारबंद माणसातही बळ आहे. दोन्ही बळांपुढे नमून मी माझी वस्तू हातची जाऊ देईन. पित्याचे बळ कोणते ? पिता चोरी करतो या विचाराने माझ्या मनात कीव उत्पन्न होईल आणि मला रडू येईल; हत्यारबंदाच्या बळाने माझ्यात रोष उत्पन्न होईल आणि आम्ही कट्टर वैरी बनू. अशी गमतीदार स्थिती आहे. या उदाहरणांवरून आपण साधनाच्या निश्चितीबाबत एकमत होऊ शकू असे नाही. वर घेतलेल्या सर्व प्रकारच्या चोरांच्या बाबतीत काय केले पाहिजे याचा इलाज मला सुचतो. पण तो ऐकून तुम्ही कदाचित भडकून जाल म्हणून मी तो तुमच्यापुढे ठेवीत नाही. तूर्त तुम्ही त्याची कल्पनाच करा, आणि जर तुम्हाला ती कल्पना येत नसेल तर प्रत्येक उदाहरणाच्या बाबतीत वेगळी वेगळी साधने वापरावी लागतील हे तर तुम्हाला दिसून येतच आहे. चोराला घालवून देण्यासाठी कोणतेही साधन उपयोगात आणले तरी चालण्यासारखे आहे असे नाही, जसे साधन तसा त्याचा परिणाम निपजेल हेही तुमच्या लक्षात आलेच असेल. म्हणून वाटेल ते करून चोराला हाकून देणे हा तुमचा धर्म नाही हे ओघानेच येते.

जरा आणखी थोडे पुढे जाऊ. तो हत्यारबंद मनुष्य तुमची वस्तू घेऊन गेला समजा. तुम्ही ते लक्षात ठेवलेत. तुम्हाला राग आलेला आहे. तुम्ही त्या लुच्च्याला स्वत:साठी नव्हे, पण लोककल्याणाकरिता शिक्षा करू इच्छीत आहा. तुम्ही माणसे जमविली आणि त्याच्या घरावर हल्ला केलात. त्याला कळले. तो पळून गेला. त्याने दुसरे दरोडेखोर जमविले. तोही चिडला आहे. तुमचे घर दिवसाढवळ्या मी लुटणार आहे असा निरोप आता त्याने तुम्हाला धाडला आहे. तुम्ही बलवान आहा, भीत नाही. तुम्ही तयारीत आहा. दरम्यान दरोडेखोर तुमच्या आजूबाजूच्या लोकांना सतावतो. ते तुमच्याकडे येऊन तक्रार करतात.

तुम्ही म्हणता : 'मी तर तुमच्याकरिता हे सर्व करीत आहे. माझा माल गेला त्याचे काही नाही मला वाटत.' लोक म्हणतात, 'पूर्वी तो आम्हाला मुळीच लुबाडीत नव्हता. तुम्ही त्याच्याशी झगडा सुरू केलात तेव्हापासून त्याने हे सुरू केले आहे.' तुम्हाला इकडे आड तिकडे विहीर असे होते. गरीबांविषयी तुमच्या मनात दया आहे. त्यांचे म्हणणे खरेच आहे. आता काय करावे ? दरोडेखोराला सोडून द्यावे ? त्यात तुमची अब्रू जाते. अब्रू सर्वांना प्यारी. तुम्ही गरीबांना सांगता : 'चिंता नाही. माझी संपत्ती ही तुमची संपत्ती समजा. मी तुम्हाला हत्यारे देतो आणि ती कशी वापरावयाची तेही शिकवितो. तुम्ही त्या बदमाषाला मारा, सोडू नका.' अशा रीतीने संग्राम वाढला. दरोडेखोर वाढले. आपल्याच हातांनी लोकांनी आपल्यावर अरिष्ट ओढवून घेतले. चोराचा सूड घेण्याचा परिणाम असा झाला की झोप विकून जागरण पदरात घेतले. शांती होती, तेथे आता अशांती झाली. याअगोदर मरण आले म्हणजे ते मरत. आता रोजचेच मरण दत्त म्हणून उभे. धैर्यवान होते तेथे लोक आता भ्याड बनले. हे काही अतिरेकी चित्र मी रेखाटले नाही, हे तुम्हाला सावकाशीने दिसून येईल. हे चोराला हाकून देण्याचे एक साधन.

आता दुसरे साधन तपासू या. चोराला तुम्ही अज्ञानी मानलेत. संधी येईल तेव्हा त्याची समजूत घालावी असे तुम्ही योजलेत. तोही माणूसच आहे, त्याने कोणत्या कारणाने चोरी केली हे आपल्याला काय कळणार, असा तुम्ही विचार केलात. वेळ आली म्हणजे त्याच्यातून चोरीचे बीजच काढून टाकावे हा तुम्ही आपला मार्ग मानलात. असा तुम्ही विचार करीत आहा, एवढ्यात तो गृहस्थ पुनः चोरी करायला आला. तुम्ही त्याच्यावर रागावला नाहीत. तुमच्या मनात त्याच्याविषयी दया उपजली. हा मनुष्य रोगी आहे असे तुम्हाला वाटले. तुम्ही खिडक्या-दरवाजे उघडून ठेवलेत. झोपण्याची जागा तुम्ही बदललीत. तुमच्या वस्तु चट्‌दिशी हाती येतील अशा ठेवल्यात. चोर आला, त्याने हे पाहिले. तो बावरला. हे त्याला काही नवीनच दिसले. माल तो घेऊन गेला, पण त्याच्या मनात खळबळ सुरू झाली. त्याने गावात चौकशी केली. तुमच्या दयाभावनेची त्याला माहिती झाली. त्याला पस्तावा झाला आणि त्याने तुमची माफी मागितली. तुमचे जिन्नस त्याने परत आणून दिले. त्याने चोरीचा धंदा सोडला. तुमचा तो सेवक बनला. तुम्ही त्याला एखाद्या कामाला लावलेत. हे दुसरे साधन.

साधन वेगळे वापरले की परिणाम वेगळा होतो हे तुम्हाला दिसले. सगळे चोर असेच वागतील किंवा सर्वांमध्ये तुमच्यासारखाच दयाभाव असेल असे यातून मला सिद्ध करायचे नाही. मला एवढेच दाखवायचे आहे की चांगले परिणाम जर निष्पन्न करायचे असतील तर साधने चांगलीच पाहिजेत. आणि नेहमी नसले तरी बहुतेक वेळा शस्त्रबळापेक्षा दयाबळ हे अधिक सामर्थ्यवान असते. शस्त्रात हानी आहे, दयेत हानी मुळीच नाही.

युद्ध ही जर हिंसेने संघर्ष
समाप्त करण्याची पद्धती असेल,
तर शांती म्हणजे
संघर्षाचा अभाव नव्हे,
हिंसेशिवाय संघर्ष समाप्त करण्याची
क्षमता म्हणजेच शांती.

- सी. टी. लॉरेन्स बटलर



वृक्षमित्र
चंद्रपूर / गडचिरोली